
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.





विनोबा

# नामदेवांचीं भजनें

REFBK-0013504

परंधाम प्रकाशन, पवनार

# नामदेवांचीं भजनें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 73408

विनोबा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ दि: ......................
क्रमांक ........................ नों. दि: ......................

REFBK-0013504

परंधाम प्रकाशन, पवनार

जून १९६३ ] [ किंमत १.००

प्रकाशक :

**भाऊ पानसे**

ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम प्रकाशन,

पो. पवनार (वर्धा)

आवृत्ति ५ वी २०००

एकूण संख्या सात हजार

सर्व हक्क प्रकाशकाधीन

किमत : १.००

मुद्रक :

**भाऊ पानसे**

परंधाम मुद्रणालय,

पो. पवनार (वर्धा)

# प्रस्तावना

नामदेवाचे अभंग निवडण्यांत परिश्रम पुष्कळ च पडला आहे. नामदेवाच्या शतकोटि उर्फ शीघ्र कवित्वामुळें त्याच्या अभंगांचा प्रमाण-भूत असा गाथा च उपलब्ध नाहीं. येथें निवडलेले सारे अभंग हि त्याचे च आहेत, असें निश्चित सांगणें कठिण आहे. ते नीट कसोटीवर कसून घेतले आहेत, आणि नामदेवाला शोभण्यासारखे आहेत, एवढें म्हणतां येईल.

नामदेव हा महाराष्ट्राचा महान् प्रचारक होता. मोरोपंतांनीं म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थानभर 'विठ्ठल'-नाम त्यानें प्रसिद्ध केलें आहे. पंजाबांत तर तो कांहीं वर्षें राहिला होता आणि पंजाबी भाषेमधें त्यानें पद्य-रचना हि करून ठेवली आहे. ह्या कवितेंतील कांहीं भाग शीखांच्या "ग्रंथ-साहेबां"त मान्य होऊन बसला आहे. त्यांतून हि कांहीं निवड ह्या संग्रहांत घेतली आहे. त्या शिवाय त्याला पूर्णता आली नसती.

ज्या गाथ्यांतून एकूण सर्व निवड केली होती, तो हरवल्याचें जेलमधें कळलें तेव्हां पुन्हां सारी निवड नव्यानें करावी लागली. मागाहून हरवलेलें पुस्तक सांपडून दोन्ही निवडी पडताळण्याचा लाभ मिळाला.

इतक्या सर्व मेहनतीचें फलित हा अमृत-मधुर संग्रह आहे. निष्काम हरि-प्रेमानें भरलेली ही वाणी साधकांच्या चित्त-शुद्धीचें साधन होऊं शकणारी आहे. वाचकांना तसा अनुभव येवो.

**पवनार,**
ता. १८-७-४६

**विनोबा**

# अनुक्रमणिका

## भाग १ ला


| प्रकरण | अध्याय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ चित्तशुद्धि : व्यक्तिगत आणि सामाजिक | १-४ | १ ते ९ |
| २ नाम-स्मरण आणि कीर्तन | ५-१० | १०-२० |
| ३ सत्संगति | ११-१४ | २१-२९ |
| ४ ईश्वर आणि त्याची भक्ति | १५-२२ | ३०-४६ |


## भाग २ रा


| | | |
|---|---|---|
| ५ साधकाची तळमळ : पूर्वावस्था | २३-२७ | ४७-५६ |
| ६ साधकाची तळमळ : उत्तरावस्था | २८-३१ | ५७-६५ |
| ७ संकल्प आणि मागणें | ३२-३६ | ६६-७५ |
| ८ दर्शनानुभव | ३७-४० | ७६-८४ |
| ९ भजनांची सूचि | — | ८५-९० |
| १० कठिण शब्दार्थांचा कोश | — | ९१-९५ |

अनुक्रम ........................ वि: ........................

क्रमांक ........ ........

# नामदेवांचीं भजनें

## भाग १ ला

### १ चित्तशुद्धि : व्यक्तिगत आणि सामाजिक

( १ )

अंतकाळीं मी परदेशी । ऐसें जाणोनि मानसीं
म्हणोनियां हृषीकेशी । शरण तुजसी मी आलों
नवमास गर्भवासीं । कष्ट झाले मातेसी
ते निष्ठुर झाली कैसी । अंतीं दूर राहिली
जीवीं बापासी आवड । मुखीं घालूनि करी कोड
जेव्हां लागली यम-ओढ । तेव्हां दूर टाकिलें
बहिणी-बंधूंचा कळवळा । तो तूं जाणसी रे दयाळा
जेव्हां लागली यम-शृंखळा । तेव्हां दूर राहिलीं
कन्या-पुत्रादिक बाळें । हीं तंव स्नेहाचीं स्नेहाळें
तुझ्या दर्शनाहूनि व्याकुळ । अंतीं दूर राहिलीं
देहगृहाची कामिनी । ते तंव राहिली भवनीं
मी तंव जळतसें स्मशानीं । अग्नीसवें एकला
मित्र आले गोत्रज आले । ते हि स्मशानीं परतले
शेंवटीं टाकोनियां गेले । मजलागीं स्मशानीं
ऐसा जाणोनि निर्धार । मग मज आला गहिंवर
तंव दाही दिशा अंधकार । मग मज कांहीं न सुचे
ऐसें जाणोनि निर्वाण पाहीं । मनुष्य-जन्म मागुता नाहीं
**नामा** म्हणे तुझे पायीं । ठाव देईं विठोबा ॥१॥

२

चोरा ओढोनियां नेइजे जैं शूळीं । चालतां पाउलीं मृत्यु जैसा
तैसी परी मज झाली नारायणा । दिवसें-दिवस उणा होत असे
वृक्षाचिये मुळीं घालितां कुऱ्हाडी । वेंचे तैसी घडी आयुष्याची
**नामा** म्हणे हें हि लहरीचें जळ । आटत सकळ भानुतेजें ॥

३

जंव हंस काया नव जाय सांडोनि । तंव घेईं ठाकोनि रामनाम
अंतकाळ-वेळीं तुझें नव्हे कोण्ही । मी माझें म्हणऊनि भुललासी
एकलें चि येणें एकलें चि जाणें । पहा दृढ ज्ञानें विचारोनि
पाप पुण्य दोन्ही अंतींचीं सांगाती । थेरें तीं राहतीं जेथींचीं तेथें
ऐसा हा संसार माया वेष्टियेला । म्हणोनि दुऱ्हावला योगिजनीं
विष्णुदास **नामा** विनवितसे तुम्हां । झणीं परब्रह्मा विसरूं नका ॥

४

जाइजणा देह जाईल नेणसी । लौकिक मिरविसी लाजसी ना
माझें माझें माझें मानिसी निभ्रांत । करिसी अपघात रात्रंदिवस
सांग तूं कोणाचा आलासी कोठूनि । दृढ बुद्धि मनीं विचारीं पां
धन-संपत्ती करोनि मदें मातलासी । पुढती पुढती पडसी गर्भवासीं
पुत्र दारा यांचा झालासी म्हणियारा । यांच्या पातकांचा भारा वाहशील
विषयाचेनि संगें भुलशील झणें । भोगिसी पतन रात्रंदिवस
**नामा** म्हणे एक ध्याई कमळापति । निजाचा सांगाती केशिराज ॥

५

आतां आहे नाहीं पाहतां क्षण एक । संपत्तीचें सुख विषय हा
हित तें आचरा हित तें विचारा । नामीं भाव धरा जाणतेनो

संपत्तीच्या बळें एक झाले आंधळे । वेढिलें कळिकाळें स्मरण नाहीं
एक विद्यावंत जातीच्या अभिमानें । नेले तमोगुणें रसातळा
मिथ्या माया मोह करोनि हव्यास । वेंचिलें आयुष्य वायांविण
**नामा** म्हणे कृपा करूनि ऐशा जीवा । सोडवीं केशवा मायबापा ॥

६

प्रपंच-घडामोडी न सरे कल्पकोडी । वासनेची बेडी पडली पायीं
सोडवण करा आलेंनो संसारा । शरण जा उदारा विठोबासी
लटकी मायादेवी गर्भवासीं गोंवी । नश्वर भोगवी नाना योनि
**नामा** म्हणे तुम्हीं विचारावें मनीं । सोयरा निर्वाणीं पांडुरंग ॥

७

अवघे सावधान होऊनि विचारा । सोडवण करा संसाराची
अवघा काळ वाचे म्हणा नारायण । वायां एक क्षण जाऊं न द्या
अवघें हें आयुष्य सरोनि जाईल । मग कोण होईल साह्य तुम्हां
अवघा हा प्रपंच जाणोनि लटिका । शरण रिघा एका पंढरीराया
अवघे मायामोहें गुंतलेती पाहा । अवघे सहज आहां ब्रह्मरूप
**नामा** म्हणे अवघे सुखाचे चि व्हाल । जरी मन ठेवाल विठ्ठलपायीं ॥

८

दुर्लभ नरदेह झाला तुम्हां आम्हां । येणें साधूं प्रेमा राघोबाचा
अवघे हातोहातीं तरूं भवसिंधु । आवडी गोविंदु गाऊं गीतीं
हिताचिया गोष्टी सांगूं एकमेकां । शोक-मोह-दुःखा निरसूं तेणें
एकमेकां करूं सदा सावधान । नामीं अनुसंधान तुटों नेदूं
घेऊं सर्वभावें रामनाम-दीक्षा । विश्वासें सकळिकां हें चि सांगूं
**नामा** म्हणे शरण रिघूं पंढरीनाथा । नुपेक्षी सर्वथा दीनबंधु ॥

( २ )

देवा हे विनंती माझी । जें म्यां सेवा करावी तुझी
आस धरावी न दुजी । अभिलाषाकारणें
तुज म्यां जीवें अनुसरावें । त्वां मज तैसें आपंगावें
आणिकाचें न म्हणावें । जन्मोजन्मीं दातारा
सेवक न करीं आणिकाचा । जन्मोजन्मीं दास तुमचा
आणिक वर्णीन तरी वाचा । उच्छिष्ट करूं नको
नामविक्रय न करावा । दान-प्रतिग्रह न घ्यावा
कष्टार्जित मेळवावा । तो चि ग्रास आपुला
विष्णुदास **नामा** म्हणे । आम्हां उपेक्षिसी झणें
जन्मोजन्मींचें पोसणें । केशवा उणें येऊं नेदीं ।। ९ ।।

१०

विषयाचा आंदणा दिसे केविलवाणा । करितसे कल्पना नानाविध
कुटुंब-पाईक म्हणवी हरीचा दास । मागे ग्रासोग्रास दारोदारीं
पोटालागीं करी नाना विटंबना । संतोषवी मना दुर्जनांच्या
वैराग्याची वार्ता कैंची दैवहता नुपजे सर्वथा प्रेमभावो
**नामा** म्हणे ऐसे तारीं एक्या गुणें । अजा आरोहण गजस्कंधीं ।।

११

वीतभर पोट लागलेंसे पाठी । साधूसंगें गोष्टी सांगूं न देई
पोट माझी माता पोट माझा पिता । पोटानें ही चिंता लाविलीसे
पोट माझा बंधु पोट माझी बहीण । पोटानें हें दैन्य मांडिलेंसे
विष्णुदास **नामा** पोटाकडे पाहे । अजूनि किती ठाय हिंडवीसी ।।

१२

परधन परदारा परहरी । ताकै निकटि बसे नृहरि
जो न भजंते नाराइणा । तिनका मैं न करउं दरसना
जिनकै भीतरी है अंतरा । जैसे पसु तैसे ओइ नरा
प्रणवति **नामदेउ** नाक हि बिना । ना सोहै बतीस लखना ॥

१३

परदारा परधन परनिंदा परपीडन । सांडोनि भजन हरीचें करा
सर्वभूतीं कृपा संतांची संगति । मग नाहीं पुनरावृत्ति जन्ममरण
**नामा** म्हणे नलगे साधन आणिक । दिधली मज भाक पांडुरंगें ॥

१४

मुखीं नाम हातीं टाळी । दया नुपजे कोणे काळीं
काय करावें तें गाणें । धिग धिग लाजिरवाणें
हरिदास म्हणोनि हालवी मान । कवडीसाठीं घेई प्राण
हरिदासाचे पायीं लोळे । केशीं धरोनि कापी गळे
**नामा** म्हणे अवघे चोर । एक हरिनाम थोर ॥

१५

पोटीं अहंतेसी ठावो । जिह्वे सकळ शास्त्रांचा सरावो
भजन चालिलें उफराटें । कोण जाणे खरें खोटें
सजीवासी हाणी लाथा । निर्जीवपायीं ठेवी माथा
सजीव तुळसी तोडा । पूजा निर्जीव दगडा
बेला करी तोडातोडी । शिवा लाखोली रोकडी
तोंड धरून मेंढा मारा । म्हणती सोमयाग करा
मृत्तिकेच्या पूजा नागा । जित्या नागा घेती डांगा
**नामा** म्हणे अवघें खोटें । एक हरिनाम गोमटें ॥

१६

हिंदू पूजै देहुरा मुसलमाणु मसीति
**नामे** सोई सेविआ जह देहुरा न मसीति ॥

१७

काय करूनि तीर्थाटणें । मन भरिलें अवगुणें
काय करावें तें तप । चित्तीं नाहीं अनुताप
मन:संकल्पाचीं पापें । न जाती तीर्थाचेनि बापें
**नामा** म्हणे सर्व सोपें । पाप जाय अनुतापें ॥

१८

देहाचें ममत्व नाहीं जों तुटलें । विषयीं विटलें मन नाहीं
तंव नित्य-सुख कैसेनि आंतुडे । नेणती बापुडे प्रेमसुख
मी चि एक भक्त मी चि एक मुक्त । म्हणवी पतित दुराचारी
**नामा** म्हणे तुझे कृपेविण देवा । केंवी जोडे ठेवा विश्रांतीचा ॥

१९

भुजंग विखार पवनाचा आहार । परी योगेश्वर म्हणूं नये
पवनाच्या अभ्यासें काया पालटी । परी तो वैकुंठीं सरता नव्हे
शुद्ध करीं मन समता धरीं ध्यान । तरी चि भवबंधन तुटेल रे
मन हें दर्पण करोनि निर्मळ । पाहें पां केवळ आत्मा स्वयें
तुझा तूं केवळ तुजमाजीं पाहीं । **नामा** म्हणे ध्याईं केशिराजु ॥

( ३ )

देहाचा अभिमान न धरावा चित्तीं । धरावी उपरति उपशम
सर्वभूतीं देव ऐसी-समबुद्धि । सांडावी उपाधि प्रपंचाची
चिंता नाकरीं **नाम्या** येणें तरसी जाण । तुज सांगितली खूण निर्वाणींची ॥ २०

२१

कां रे शिणतोसी घरदार-बंधनें । वायां चि व्यसनें आणितोसी
सर्वभावें हरी-भजन तूं करीं । भक्ति हे पुढारी तारील सत्य
**नामा** म्हणे दया मांडीं सोडीं माया । भजन लवलाह्या हरीचें करीं ॥

२२

लौकिकाची कांहीं न धरावी लाज । हें चि निज काज साधावें तें
निंदा करिती तो मानावा आदर । स्तुति तें उत्तर नायकावें
न धरावी चाड मान-सन्मानाची । आवडी भक्तीची रूढवावी
**नामा** म्हणे हें चि रूढवावें मानसीं । क्षण एक नामासी विसंबूं नयें ॥

२३

निर्विकल्प ब्रह्म कैसेनि आतुडे । जंववरी न मोडे मीतूंपण
शब्द-चित्र-कथा सांगती पाल्हाळ । मन नाहीं निश्चळ हरि-पायीं
अणूतें प्रमाण होतां दुजेपण । मेरूतें समान देईल दुःख
**नामा** म्हणे ब्रह्म सर्वांभूतीं पाहीं । तरी ठाईंचा ठाईं निवशील ॥

२४

परब्रह्मींची गोडी नेणती बापुडीं । संसार-सांकडीं विषयभरित
तूंतें चुकली रे जगजीवनरक्षा । अनुभवाविण लक्षा नये चि रे कोणा
जवळीं असतां क्षीर नव्हे चि वरपडा । रुधिर सेवितां गोचिडा जन्म गेला
दर्दुरा कमळिणी एके ठाईं बिढार । वास तो मधुकर घेऊनि गेला
**नामा** म्हणे ऐसीं चुकलीं बापुडीं । अमृत सेवितो पुडी चवी नेणे ॥

२५

संसार करितां देव जैं सांपडे । तरी कां झाले वेडे सनकादिक
संसारीं असतां जरी देव भेटता । शुकदेव कासया जाता तयालागीं
ज्ञातीच्या आचारें सांपडे जरी सार । तरी कां निरहंकार झाले साधु
**नामा** म्हणे आतां सकळ सांडून । आलोंसें शरण विठोबासी ॥

२६

संसार-सागर भरला दुस्तर । विवेकी पोहणार विरळा संत
कामाचिया लाटा अंगीं आदळती । नेणों गेले किती पोहूनियां
भ्रम हा भोंवरा फिरवी गरगरा । एक पडिले घरा चौऱ्यांशीच्या
नावाड्या विठ्ठल भवसिंधु-तारूं । भक्तां पैलपारू उतरीतसे
**नामा** म्हणे नाम स्मरा श्रीरामाचें । भय कळिकाळाचें नाहीं तुम्हां ॥

( ४ )

पापाचें संचित देहासी दंडण । तुज नारायणा बोल नाहीं
सुख अथवा दुख भोगणें देहासी । सोस वासनेसी वाऊगा चि
पेरी कडू जिरें इच्छी अमृतफळ । अर्कवृक्षा केळ केवीं होय
मुसळाचें धनु न होय सर्वथा । पाषाण पिळितां रस कैंचा
**नामा** म्हणे देवा तुज कां रुसावें । मनासी पुसावें आपुलिया ॥२७॥

२८

अरे अलगटा माझिया तूं मना । किती रानोरानां हिंडविसी
विठोबाचे पायीं दृढ घालीं मिठी । कां होसी हिंपुटी वायांविण
संकल्प विकल्प सांडीं तूं समूळ । राहें रे निश्चळ क्षणभरी
आपुलें निजहित जाण तूं त्वरित । वासनारहित होईं वेगीं
**नामा** म्हणे तुज ठाईंचें कळतें । सोसणें कां लागते गर्भवास ॥

२९

क्षण एक मना बैसोनि एकांतीं । विचारीं विश्रांति कोठें आहे
लक्ष चौऱ्यांशीच्या करितां येरझारा । शिणलासी गव्हारा वेळोवेळां
दुर्लभ आयुष्य मनुष्य-देहींचें । जातसे मोलाचें वायांविण
**नामा** म्हणे तुज येतों काकुळती । सोडीं रे संगति वासनेची ॥

३०

वासनेची करणी आइकें तूं मना । या केली रचना ब्रह्मांडाची
निर्गुण चैतन्य सदा सुख-राशि । त्या दिलीं चौऱ्यांशी लक्ष सोंगें
ऐसी हे लाघवी पाहतां क्षणभंगुर । ब्रह्मादि हरिहर ठकिले इणें
**नामा** म्हणे तरी चि इचा संग तुटे । दैवयोगें भेटे संत-संग ॥

३१

परियेसी वासने संकल्पस्वरूपे । विश्व त्वां आटोपें वश केलें
ब्रह्मादिक तुझे इच्छेचें खेळणें । विषयाकारणें लोलिंगत
परी माझ्या मना सांडीं वो समर्थे । देईं मज दीनातें कृपादान
**नामा** म्हणे पुढती गांजिसील मज । येईल केशिराज सोडवणे ॥

३२

सदा पैं परिपूर्ण जयाचें रूपडे । तेथें चि माजिवडें मन करीं
होईल उद्धार तुटेल संसार । सर्व मायापूर दूर होय
कंटाळा कायेचा दुरावा मायेचा । हें चि जप वाचा स्मरें राम
**नामा** म्हणे करी सर्व हरि हरि । राम हें उत्तरीं वाखाणीं पां ॥

## २ नाम-स्मरण आणि कीर्तन

### ( ५ )

आगमीं नाम निगमीं नाम । पुराणीं नाम केशवाचें
अर्थीं नाम पदीं नाम । धृपदीं नाम केशवाचें
ऐसें नाम बहु सुंदर । नामीं तरले लहान थोर
**नामा** म्हणे अंतर । पडों नेदीं याउपर ।। ३३ ।।

३४

गोक्षीर लाविलें आंधळिया-मुखीं । तेथील पारखी जिह्वा जाणे
तैसें देवा तुझें नाम निरंतर । जिह्वेसी पाझर अमृताचे
सोलूनियां केळें साखरें घोळिलें । आंधारीं खादलें तरी गोड
जाणोनियां **नामा** करी विनवणी । अमृताची खाणी नाम तुझें ।।

३५

काखे पान अंगणीं उभें उगें । भोजन मागें रामनाम
आणिक नाहीं मज चाड । रामनाम गोड जेवूं घाला
अन्नरस सेवितां मंद पडलें । तुझे चि नामें रुचीस आलें
इच्छा-भोजनीं तूं एक दाता । **नामा** विनवी पंढरीनाथा ।।

३६

नाम तें चि रूप रूप तें चि नाम । नामरूप भिन्न नाहीं नाहीं
आकारला देव नामरूपा आला । म्हणोनि स्थापिलें नाम वेदीं
नामापरता मंत्र नाहीं हो आणिक । सांगती ते मूर्ख ज्ञानहीन
**नामा** म्हणे नाम केशव केवळ । जाणती प्रेमळ भक्त भले ।।

३७

मंत्राचा पैं मंत्र हरि हा उच्चार । न लगे तो विचार करणें कांहीं
सुफळ नाम गाढें वाचेसीं उच्चारूं । केशव हा चि करूं सर्वांभूतीं
नाहीं त्यासी पतन नव्हेल बंधन । नित्य हें चि स्नान रामनामें
**नामा** म्हणें भाव सर्वांभूतीं करा । आणिक पसारा घालूं नका ॥

३८

नामापरता मंत्र नाहीं त्रिभुवनीं । ऐसी बोले वाणी वेदशास्त्रीं
पहा विचारूनि अनुभव मनीं । नका आडरानीं झणीं भरूं
नामावांचूनियां तरलों जे म्हणती । ते आधीं बुडती भवाब्धींत
**नामा** म्हणे नाम ओंकाराचें मूळ । ब्रह्म तें केवळ रामनाम ॥

३९

विठ्ठल विठ्ठल म्हणा उघडा मंत्र जाणा । कळिकाळ आंकणा होईल तुम्हां
वेदांचें हें सार शास्त्रांचें गह्वर । तें जाणा अक्षर विठ्ठलनाम
न करावें खंडण अखंड उच्चारण । देश काळ वर्तमान नाहीं येथें
जीवींचें निजगूज मुक्तीचें तें बीज । **नामा** म्हणे मज सांपडलें ॥

४०

काळ वेळ नसे नामसंकीर्तनीं । उंच नीच योनि हें हि नसे
धरा नाम कंठीं सदा सर्वकाळ । मग तो गोपाळ सांभाळील
कृपाळु कोंवळा सुखाचा सागर । करील उद्धार भाविकांसी
**नामा** म्हणे फार सोपें हें साधन । वाचे नाम घेणें इतुकें चि ॥

( ६ )

न लगती कथा व्युत्पत्ति उलथा । वाउग्या चळथा ग्रंथांचिया
हरि हरि भजन जनीं जनार्दन । सर्वत्रीं समान भूतदया

भावें चि भजावें हरीतें पूजावें । नित्य हें सेवावें रामनाम
**नामा** म्हणे गोड नको तें हें वाड । विठ्ठलाचें वेड इतुकें पुरें ।।४१।।

४२

न पढावे वेद नको शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा
नव्हे ब्रह्मज्ञान न होय वैराग्य । साधा भक्तिभाग्य संतसंगें
येर क्रियाकर्म करितां हो कळी–। माजीं कोण बळी तरले सांगा
**नामा** म्हणे गूज सांगितलें संतीं । यापरती विश्रांति आणिक नाहीं ।।

४३

केशव म्हणतां क्लेश जाती परते । त्याहूनि सरतें आणिक नाहीं
वेद कां पढसी शास्त्रें कां शिणसी । उदंड वाचेसीं हरि म्हण
पहा याहूनियां आन नाहीं दुसरें । भीष्में युधिष्ठिर उपदेशिला
**नामा** म्हणे धरीं केशवीं विश्वास । तरसी गर्भवास नामें एके ।।

४४

साराचें हि सार भक्तीचें भांडार । नाम निरंतर गातां वाचे
कासया करावें आणिक साधन । नामाविण क्षण जाऊं नेदी
दया शांति क्षमा हें चि पैं भूषण । नामसंकीर्तन अहर्निशीं
**नामा** म्हणे जप अखंड नामाचा । काळ हा सुखाचा सदोदित ।।

४५

भवसिंधूचा पार तरावयालागीं । साधन कलियुगीं आणिक नाहीं
अहर्निशीं नाम जपा श्रीरामाचें । जें सकळ धर्माचें मुकुट-मणि
न चले वर्णाश्रम धर्म-आचरण । न घडे व्रत दान तप कोणा
नव्हे तीर्थाटन पुराण-श्रवण । नव्हे ब्रह्म-ज्ञान शास्त्र-बोध
**नामा** म्हणे नाम राघोबाचें गातां । ब्रह्म-सायुज्यता घर रिघे ।।

४६

नामें सदा शुद्धि प्राणिया होतसे । नामापासीं असे भक्ति मुक्ति
नामाऐसें सोपें नाहीं त्रिभुवनीं । नाम संजीवनी साधकांसी
यज्ञ-दान-तपें नामें आलीं हाता । नामें सर्व सत्ता प्राप्त होय
**नामा** म्हणे सदा नाम ज्याचे मुखीं । नाहीं त्याचे तुकीं दुजा कोणी ।।

( ७ )

कपटाचें कुपथ्य झालें तुझे पोटीं । स्मरावा जगजेठी कृपाळु तो
नाम-औषध घ्यावें नाम-औषध घ्यावें । संतांचे लागावें समागमीं
त्यांपासी औषध आहे नानाविध । राम कृष्ण गोविंद म्हणती वाचे
पुत्रस्नेहें कैसा अजामेळ स्मरला । तेणें तो उद्धरिला क्षणमात्रें
राम-नाम स्मरतां तारिली कुंटिणी । वैकुंठ-भुवनीं तिये वासु
तें चि हें औषध प्रह्लादें घेतलें । तें तूं घे उगलें म्हणे **नामा** ।।४७।।

४८

असत्याचे मळ बैसले ये वाचे । ते न फिटती साचे तीर्थोदकें
हरिनामामृत प्रक्षाळी जिह्वेतें । पाणियें बहुतें काय करिती
गंगासागरादि तीर्थें कोडीवरी । हरिनामाची सरी न पवती
हरिनामगंगें सुस्नात पैं झाला । **नाम्या**जवळीं आला केशिराज ।।

४९

हडबडलीं पातकें । घेतां रामनाम एक
नाम घेतां तत्क्षणीं । चित्रगुप्तें सांडिली लेखणी
घेउनी पूजेचा संभार । ब्रह्मा येतसे सामोर
**नामा** म्हणे जरी हें लटकें । तरी माझें छेदावें मस्तक ।।

५०

गीता हे चि गंगा गुह्यभाव पैं गा । नाम हें चि जगा सोडवण
सर्व ब्रह्म हरि सांगत मुरारि । विश्वरूप हरि आपण झाला
उपदेश अर्जुना जनीं जनार्दन । अखंड भावना भूतदया
**नामा** म्हणे सर्व आहे हा चि देव । उदार माधव सर्वां भूतीं ।।

५१

राम म्हणतां राम चि होसी । भाक घेईं मजपासीं
लवण समुद्रा जागा मागे । तें चि समुद्र झालें अंगें
वात दीपासंगें गेली । ते हि दीप अंगें झाली
**नामा** म्हणे भाविक लोकां । नाम घेतां राहूं नका ।।

५२

तान्हेलों भुकेलों । तुझेनि नामें निवालों
तहान नेणें भूक नेणें । अखंड पारणें नामीं तुझ्या
अमृतलिंग केशव हा चित्तीं । तेणें **नामया** तृप्ति अखंडित ।।

( ८ )

देह जावो हे चि घडी । पाय हरीचे न सोडी
क्लेश हो नानापरी । मुखीं राम कृष्ण हरि
क्रीडा वैष्णवांचे मेळीं । हांक केशव आरोळी
**नामा** म्हणे विठोबासी । जें तें घडो या देहासी ।।५३।।

५४

लपलासी तरी नाम कैसें नेसी । आम्ही अहर्निशीं नाम गाऊं
आम्हांपासूनियां जातां न ये तुज । तें हें वर्मबीज नाम घोकूं
आम्हांसी तों तुझें नाम चि पाहिजे । मग भेटी सहजें देणें लागे
भोळीं भक्तें आम्ही चुकलों होतों वर्म । सांपडलें नाम **नामयासी** ।।

५५

न लगे तुझी मुक्ति न लगे तुझी भक्ति । मज आहे विश्रांति वेगळी चि
न करी तुझें ध्यान न लगे ब्रह्मज्ञान । माझी आहे खूण वेगळी चि
न करी काया-क्लेश इंद्रियां निरोध । माझा आहे बोध वेगळा चि
**नामा** म्हणे नाम गाईन निर्विकल्प । येसी आपोआप गिंवसीत ।।

५६

मनु मेरो गजु जिह्वा मेरी काती । मपि मपि काटउँ जम की फाँसी
कहा करउँ जाती कहा करउँ पाती । रामको नाम जपउँ दिन राती
रांगनि रांगउँ सीवनि सीवउँ । राम नाम बिनु घरीअ न जीवउँ
भगति करउँ हरि के गुन गावउँ । अठ पहर अपना खसमु धिआवउँ
सुईनेकी सुई रूपेका धागा । **नामेका** चितु हरिसउ लागा ।।

५७

धरीं रे मना तूं विश्वास या नामीं । अखंड रामनामीं ओळखी धरीं
जप करीं ऐसा अखंड खंडे ना । निशिदिनीं मना होय जागा
**नामा** म्हणे मना होईं रामरूप । अखंडित जप सोहं सोहं ।।

५८

रे जिह्बा करउ सत खंड । जामि न उचरसि स्री गोविंद
रंगीले जिह्बा हरिकै नाई । सुरंग रंगीले हरि हरि धिआई
मिथिआ जिह्बा अवरे काम । निरबाणु पदु इकु हरिको नामु
असंख कोटि अनपूजा करी । एक न पूजसि नामै हरि
प्रणवै **नामदेउ** इहु करणा । अनंत रूप तेरे नाराइणा ।।

( ९ )

नाचतां उडतां रडतां पडतां । नाम्या अवचितां हातां आला
येतां जातां हरि हरि हरि वाटे । नाम तें चोखटें स्मरों मुखीं
हांसतां खेळतां घरीं दारीं पारीं । मुखीं हरि हरि म्हणा का रे
**नामा** म्हणे नामीं अस्ति नास्ति ठसा । केशव हरि सन्मुख तुम्हां दिसे

६०

एक तत्त्व हरि निर्धार तूं धरीं । प्रपंच-बोहरी एका नामें
अच्युत गोविंद परमानंद छंद । नित्य तो आह्लाद हरिनाम
ऐसा तूं विनटें हरिनाम-पाठें । जाशील वैकुंठें नश्वरितां
**नामा** म्हणे तत्त्व नाम गोविंदाचें । हें चि धरीं साचें येर वृथा ॥

६१

ब्राह्मणां न कळे आपुलें तें वर्म । गंवसे परब्रह्म नामें एका
लहान थोरांसी करितों प्रार्थना । दृढ नारायणा मनीं धरा
केशव नारायण करावें आचमन । तें चि संध्यास्नान कर्म तयां
**नामा** म्हणे हें चि करा नित्य भजन । ब्रह्मार्पण साधन याचे पायीं ॥

६२

नामाचा महिमा नेणें चि पैं ब्रह्मा । म्हणोनियां कर्मा अनुसरला
नाम हें चि कर्म नाम हें चि धर्म । केशव हें चि वर्म सांगितलें
करितां आचमन केशव नारायण । करितां उच्चारण आधीं हें चि
लग्नाचिये काळीं म्हणती सावधान । लक्ष्मीनारायण-चिंतन करा
देहाचिये अंतीं प्रायश्चित्त देती । शेंवटीं वदविती रामनाम
करिती पितृश्राद्ध कर्म आचरती । शेंवटीं म्हणती एको विष्णु
नामें होय गति नामें होय मुक्ति । **नामयाचे** चित्तीं रामनाम ॥

६३

वेदाध्ययन करिसी तरी वैदिक चि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना
गायन करिसी तरी गुणिजन होसी । परी वैष्णव न होसी अरे जना
पुराण सांगसी तरी पुराणिक चि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना
कर्म आचरसी तरी कर्मठ चि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना
यज्ञ करिसी तरी याज्ञिक चि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना
**नामा** म्हणे नाम केशवाचें घेसी । तरी चि वैष्णव होसी अरे जना ।।

६४

करितां वेदाध्ययन ज्योतिष । नामाचा तो लेश न ये हातां
बहुत व्युत्पत्ति पुराण । व्यर्थ तें स्मरण नाम नव्हे
अनंत हें नाम जयांतूनि आलें । त्यांत चि जिरालें जळीं जळ
**नामदेव** म्हणे स्वत:सिद्ध नाम । गुरूविण वर्म हातां नये ।।

( १० )

सर्वांग-साजिरीं आहेत इंद्रियें । तंव सावध होयें हरिकथे
कीर्तन नर्तन वाचे जनार्दन । न पवसी पतन येरझारी
पूर्ण मनोरथ घडती एका नामें । दाटेल सप्रेमें जीवहेतु
**नामा** म्हणे विलास न करीं तूं आणिक । सर्वीं सर्व एक नाम असे ।।६५।।

६६

प्रेमामृत-सरिता पवित्र हरिकथा । त्रिभुवनींच्या तीर्थां मुगुटमणि
तेथें माझ्या मना होईं क्षेत्रवासी । राहें संतांपासीं सुख घेतां
ऐहिक्य परत्र दोन्ही समतीरीं । परमानंद-लहरी झेंपावत
मुक्तांचें जीवन, मुमुक्षां माउली । शिणलेया साउली विषयासक्तां
परमहंसकुळ सनकादि सकळ । राहिले निश्चळ करोनि चित्त
**नामा** म्हणे मना सोयरे हरिजन । तारक त्यांचे चरण दृढ धरीं ।।

६७

जें जें पुण्य जोडे हरिनामगजरीं । त्याचे वांटेकरी दोघे जण
सावधान श्रोता आणि प्रेमळ वक्ता । जो भजे अनंता निर्विकल्प
तेणें सुखें सुख चढे नित्य नवें । जाणती अनुभवें संतजन
**नामा** म्हणे धन्य ते झाले संसारीं । न संडिती वारी पंढरीची ॥

६८

शेतीं बीज नेतां थोडें । मोटे आणिताती गाडे
एक्या नामें हरि जोडे । फिटे जन्माचें सांकडें
बाळे भोळे जन । सर्व तरती कीर्तनें
**नामा** म्हणे नेणे मूढ । नाम स्मरावें साबडें ॥

६९

एके हातीं टाळ एके हातीं दिंडी । म्हणें वाचा उदंडीं रामनाम
श्रीहरीसारिखा गोसावी पैं चांगु । फेडिला पैं पांगु जन्मांतरींचा
ऐसें नृत्य करीं वेडिवे बागडें । वदन वांकुडें करूनियां
चुकलें पाडस कुरंगिणी गिंवसी । तैसा हृषीकेशी न्याहाळी तूंतें
धेनु पान्हाय हुंबरे वत्सातें । तैसा वोरसे तूंतें केशिराज
**नामा** म्हणे इतुकें न करवे निर्दैवा । तरी वाचेसीं केशवा उच्चारीं पां ॥

७०

टाळ दिंडीं हातीं उभा महाद्वारीं । नामा कीर्तन करी पंढरीये
आवडीचेनि सुखें वोसंडतु प्रेमें । गातो मनोधर्में हरीचे गुण
सांडोनि अभिमान नाचे धरोनि कान । अंतरीं तें ध्यान विठोबाचें
श्रीहरीचीं उत्तम जन्म-कर्म-नामें । घेतलीं तीं प्रेमें सुखरूपें

संतांची विश्रांति ज्ञानियांचें गूज । जें का मुक्तिबीज मोक्षदानी
कृष्णा विष्णू हरी मुकुंदा मुरारी । अच्युता नरहरी नारायणा
गोवर्धनधरा गोपी-मनो-हरा । भक्त-करुणाकरा पांडुरंगा
सकळमंगळनिधी पातक-भंजना । हरी जगजीवना परमानंदा
तूं चि हें सकळ आदि-मध्य-अंतीं । निजसुख-संपत्ति सज्जनांची
तूं चि माझा श्रोता तूं चि माझा वक्ता । तूं चि देता घेता प्रेमसुख
विष्णुदास **नामा** विनवी पुरुषोत्तमा । सोडवीं भवभ्रमापासूनियां ।।

७१

हातीं वीणा मुखीं हरि । गाये राउळाभीतरीं
अन्न-उदक सोडिलें । ध्यान देवाचें लागलें
स्त्री पुत्र बाप माय । यांचा आठव न होय
देहभाव विसरला । छंद हरीचा लागला
**नामा** म्हणे हें चि देईं । तुझे पाय माझी डोई ।।

७२

आम्हां कीर्तन कुळवाडी । आणिक नाहीं उदीम-जोडी
वाचा पिकली पिकली । हरिनामाची वरो झाली
एकादशीचे दिवशीं । झाल्या कैवल्याच्या राशि
संत म्हणती **नामा** आला । हरिनामाचा सुकाळ झाला ।।

७३

पूर्ण कृपा केली देवा । दिधली पादपद्म-सेवा
पापें पळालीं पळालीं । नामकीर्तन-कल्लोळीं
रंगमाळा जागरणीं । तेथें मुक्ति वाहती पाणी
जन्म वैष्णव-कुळीं द्यावा । घडो संतांची या सेवा ।।

७४

आम्हां वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा । विश्वास नामाचा सर्वभावें
तरी त्याचे दास म्हणतां श्लाघिजे । निर्वासन कीजे चित्त आधीं
गाऊं नाचूं आम्ही आनंदें कीर्तनीं । भुक्ति मुक्ति दोन्ही न मागूं देवा
वृत्तीसहित मन बुडे प्रेमडोहीं । नाठवती देहीं देहभाव
सगुणीं निर्गुणीं एक चि आवडी । चित्तें दिली बुडी चिदानंदीं
**नामा** म्हणे देवा ऐसी मज सेवा । द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं।।

७५

काळ देहासी आला खाऊं । आम्ही आनंदें नाचूं गाऊं
कोणे वेळेस काय बा गाणें । हें तों भगवंता मी नेणें
टाळ मृदंग दक्षिणेकडे । माझें गाणें पश्चिमेकडे
**नामा** म्हणे बा केशवा । जन्मोजन्मीं द्यावी सेवा ।।

७६

हंसत खेलत तेरे देहुरे आइआ । भगति करत नामा पकरी उठाइआ
हीनडी जात मेरी जादमराइआ। छीपेके जनमि काहेकउ आइआ
लै कमली चलिओ पलटाइ । देहुरै पाछै बैठा जाइ
जिउ जिउ **नामा** हरिगुण उचरै । भगतजनांकउ देहुरा फिरै ।।

## ३ सत्संगति

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 73408

( ११ )

संतपायीं माया धरितां सद्भावें । तेणें भेटे देव आपआप
म्हणूनि संतां अखंड भजावें । तेणें भेटे देव आपेंआप
साधूपाशीं देव कामधंदा करी । पीतांबर धरी वरी छाया
**नामा** म्हणे देव इच्छी संतसंग । आम्हां जिवलग जन्मोजन्मीं ।।७७।।

७८

संत-चरण-रज सेवितां सहज । वासनेचें बीज जळुनी जाय
मग रामनामीं उपजे आवडी । सुख घडोघडी वाढों लागे
भेदभ्रम आटे आशापाश तुटे । विश्रांति हे भेटे संतसंगें
प्रेमें कंठ दाटे आनंदें पूर लोटे । हृदयीं प्रगटे रामरूप
**नामा** म्हणे सोपें साधन गोमटें । साधे ज्या उत्कृष्ट पूर्वपुण्यें ।।

७९

वासनेविरहित होउनी एकवट । असावें निकट संत-संगें
हें चि माझें तीर्थ हें चि माझें व्रत । करावें दास्यत्व हरि-भक्तांचें
**नामा** म्हणे केशवा तरी चि शरणागत । नाहीं तरी पतित म्हणा मातें ।।

८०

होईन संतांचा वोळगणा । दास डिंगर पोषणा
प्रेम द्यावें नारायणा । भूतदया परिपूर्णा
संतचरणींचें रज । हें चि सर्व तीर्थ मज
सेवीन संत-उष्टावळी । तेणें पवित्र माझी कुळी

राखेन संतांचें मी द्वार । तें मज वैकुंठाहूनि थोर
**नामा** म्हणे पंढरीनाथा । न मागें आन कांहीं सर्वथा ।।

८१

संतांच्या चरणा द्यावें आलिंगन । जीवें निंबलोण उतरावें
तेथें तूं निश्चळ राहें माझ्या मना । मग तुज यातना न होती कांहीं
संतांचे द्वारींचा होईं द्वारपाळ । तुटे मायाजाळ मोहपाश
संतांचे प्रसाद सेविसी उरले । आयुष्य सरलें दुणावेल
**नामा** म्हणे संत आहेत कृपासिंधु । देती भक्तिबोधु प्रेमसुख ।।

८२

ज्ञानेविण मोक्ष नाहीं हा सिद्धांत । वेद बोले हात उभारोनि
तरी तें चि ज्ञान जाणायालागूनि । संतां वोळगोनि वश्य कीजे
प्रपंच हा खोटा शास्त्रें निवडिला । पाहिजे साक्षिला सद्गुरु तो
**नामा** म्हणे सेवा घडावी संतांची । व्हावी कृपा त्यांची तें चि ज्ञान ।।

८३

परिसाचेनि संगें लोह होय सुवर्ण । तैसा भेटे नारायण संतसंगें
कीटकी ध्यातां भृंग झाली तो चि वर्ण । तैसा भेटे नारायण संतसंगें
अग्नीस मिळे तें न ये परतोन । तैसा भेटे नारायण संतसंगें
**नामा** म्हणे केशवा मज देईं संतसंग । आणिक कांहीं तुज न मागें बापा ।।

८४

रविरश्मि धरोनि स्वर्गीं जाऊं येईल । परी साधुसंगतीचा पार न कळे न कळे
स्वप्नींचा हा ठेवा साच हि होईल । परी साधुसंगतीचा पार न कळे न कळे
**नामा** म्हणे केशवा बरा साधुसंग । यावेगळा भवरोग न तुटे न तुटे ।।

( १२ )

ब्रह्ममूर्ति संत जगीं अवतरले । उद्धरावया आले दीनजनां
ब्रह्मादिक त्यांचे वंदिती पायवणी । नाम घेतां वदनीं दोष जाती
हो कां दुराचारी विषयीं आसक्त । संतकृपें त्वरित उद्धरतो
अखंडित **नामा** त्यांची वास पाहे । निशिदिनीं ध्याये सत्संगति ॥ ८५ ॥

८६

कडू वृंदावन साखरें घोळिलें । तरी काय गेलें कडूपण
तैसा तो अधम करी तीर्थाटण । नोहे त्याचें मन निर्मळत्व
बचनाग-रवा दुग्धीं शिजविला । तरी काय गेला त्याचा गुण
**नामा** म्हणे संतसज्जन-संगती । ऐशास हि गति काळांतरीं ॥

८७

धिग धिग तो ग्राम धिग धिग तो आश्रम । संत समागम नाहीं जेथें
धिग धिग ते संपत्ति धिग धिग ते संतति । भजन सर्वभूतीं नाहीं जेथें
धिग तो आचार धिग तो विचार । वाचें सर्वेश्वर नाहीं जेथें
धिग तें गाणें धिग तें पढणें । विठ्ठलनाम-नाणें नाहीं जेथें
**नामा** म्हणे धिग धिग त्यांचें जिणें । एका नारायणेंवांचूनियां ॥

८८

त्यागेंविण विरक्ति प्रेमावांचूनि भक्ति । शांति नसतां ज्ञप्ति शोभा न पवे
दमनेंवांचूनि यति मानेविण भूपति । योगी नसतां युक्ति शोभा न पवे
हेतुवांचूनि प्रीति गुणरहित स्तुति । करणीवांचून कीर्ति शोभा न पवे
सत्समागमसंगति बाणली नसतां चित्तीं । **नामा** म्हणे क्षिती शोभा न पवे ॥

८९

वेदपरायण मनीं तो ब्राह्मण । चित्त समाधान संतुष्ट सदा
येरां माझें नमन सर्वसाधारण । ग्रंथाचें राखण म्हणोनियां
शास्त्रज्ञपंडित तो मी बहु मानीं । जो आपणा जाणोनि तन्मय झाला
पुराणिक ऐसा मानितों कृतार्थ । विषयीं विरक्त विधि पाळी
मानीं तो हरिदास ज्या नामीं विश्वास । मी त्याचा दास देहभावें
**नामा** म्हणे ऐसे कै भेटविसी विठ्ठला । त्यांलागीं फुटला प्राण माझा॥

९०

मंत्र तंत्र दीक्षा सांगतील लक्ष । परी राम प्रत्यक्ष न करी कोणी
प्रत्यक्ष दावील राम धरीन त्याचे पाय । आणिकांची काय चाड मज
सर्वकर्मीं राम भेटविनी मातें । जीवेंभावें त्यांतें ओवाळीन
**नामा** म्हणे आम्हां थोर लाभ झाला । सोयरा भेटला अंतरींचा ॥

( १३ )

संतांचें लक्षण ओळखावया खूण । दिसती उदासीन देहभावा
सतत अंतरीं प्रेमाचा जिह्वाळा । वाचे वसे चाळा रामकृष्ण
तुझ्या ध्यानीं ज्याचें सदा भरलें मन । विश्व तूं चि म्हणून भजती भावें
ऐसे नित्यानंदें बोधें जे निवाले । ते जीवावेगळे न करीं **नाम्या**॥९१॥

९२

क्रिया कर्म धर्म तिहीं केलें सांग । जिहीं पांडुरंग देखियेला
ओळखोनि मनें धरिला मानसीं । उभा अहर्निशीं हृदयकमळीं
निजानंद-बोधें नामाचेनि छंदें । डोलती आनंदें वोसंडत
नाहीं देहस्मृति निमाली वासना । मावळली ल्पना भावाभाव
अखंड विदेही रजतमावेगळे । भोगिती सोहळे प्रेमसुख
त्यांचिये द्वारींचा झालोंसें सांडोवा । म्हणोनि केशवा पढिये **नामा**॥

९३

ज्याचिया रे मनें देखियलें तुज । त्याची लोकलाज मावळली
नाहीं तया क्रिया नाहीं तया कर्म । वर्णाश्रमधर्म सुखदुःख
नाहीं देहस्फूर्ति जातिकुळभेद । अखंड आनंद ऐक्यतेचा
**नामा** म्हणे त्याचे चरणरज व्हावें । हें चि भाग्य द्यावें केशिराजा ।।

वैष्णवाघरीं सर्वकाळ । सदा झणझणती टाळ
कण्याभाकरीचें खाणें । गांठीं रामनाम-नाणें
बैसावयासी कांबळा । द्वारीं तुळसी रंगमाळा
**नामा** म्हणे नेणती कांहीं । चित्त अखंड विठ्ठलपायीं ॥

९५

सर्वभूतीं पाहे एक वासुदेव । पुसोनियां ठाव अहंतेचा
तो चि संत साधु ओळखावा निका । येर ते आइका मायाबद्ध
देखिलिया धन मृत्तिकेसमान । नवविध रत्न जैसे धोंडे
काम-क्रोध दोघे घातले बाहेरी । शांति क्षमा घरीं राबवीत
**नामा** म्हणे नाम गोविंदाचें वाचे । विसंबेना त्याचें क्षणमात्र ।।

९६

जैसा वृक्ष नेणे मान-अपमान । तैसे ते सज्जन वर्तताती
येऊनियां पूजा प्राणी जे करिती । त्याचें सुख चित्तीं तया नाहीं
अथवा कोणी प्राणी येऊनि तोडिती । तया न म्हणती छेदूं नका
निंदास्तुति सम मानिती जे संत । पूर्ण धैर्यवंत साधु ऐसे
**नामा** म्हणे त्यांची जरी होय भेटी । जीवा शिवा गांठी पडुनी जाय

९७

निंदील हे जन सुखे निंदू द्यावें । सज्जनीं स्वभावें क्षोभूं नये
निंदा स्तुति ज्यासी समान पैं झाली । त्याची स्थिति आली समाधीसी
शत्रु मित्र ज्यासी सम समानत्वें । तो चि पैं देवातें आवडला
माती आणि सोनें भासे ज्या समान । तो एक निधान योगिराज
**नामा** म्हणे ऐसे भक्त जे असती । तेणें पावन होती लोक तिन्ही ।।

९८

सुवर्ण आणि परिमळ । हिरा आणि कोमळ
योगी आणि प्रेमळ । हें दुर्लभ जी दातारा
धनवंत आणि दयाळु । व्याघ्र आणि कृपाळु
अग्नि आणि शीतळु । हें दुर्लभ जी दातारा
ऐसा संपूर्ण सर्वगुणीं । केंवीं पाविजे शारंगपाणी
**नामा** करी विनवणी । मुक्ति चरणीं त्याचिया ।।

९९

भवसिंधूचा पार तरे तो पोहणार । बळिया परम धीर धन्य तो चि
नामाची सांगडी लावूनि अभ्यास । हृदयीं प्रेमरस वोसंडत
सत्त्वाचा सुभट असंग एकट । वैराग्य उद्भट निर्वासन
कामक्रोध जेणें घातले तोडरीं । निर्दळिले वैरी लोभदंभ
रजतमाचे जेणें तोडिले अंकुर । केला अहंकार देशोधडी
**नामा** म्हणे जया नामीं अनुसंधान । तो चि परम धन्य त्रिभुवनीं।।

( १४ )

नव्हे तें चि कैसें झालें रे खेळिया । नाहीं तें चि दिसूं लागलें रे
अरूप होतें तें रूपासी आलें । जीव-शिव नांव पावलें रे
आपली चि आवडी धरूनि खेळिया । आप आपणातें व्यालें रे
ऐक खेळिया तुज सांगितलें ऐसें । जाणूनि खेळ खेळें रे
ब्राह्मणाचें पोर एक खेळासी भ्यालें । तें बारा वर्षे लपालें रे
कांपत कांपत बाहेरी आलें । तें नागवें चि पळुनी गेलें रे
चौ तोंडयाचा पोर एक नाऱ्या हिंजाण । तो खेळियांमाजीं आगळा रे
कुचाली करूनि पोरें भांडवी । आपण राहे वेगळा रे
खेळ खेळे परी डायीं न सांपडे । तो एक खेळिया शाहणा रे
खेळियांमाजीं हनुम्या शहाणा । न पडे काम-व्यसनीं रे
काम चि नाहीं तेथें क्रोध चि कैंचा । तेथें कैंचे भांडण रे
रामा गडयाची आवडी मोठी । म्हणूनि लंके पेणें रे
यादवांचा पोर एक गोप्या भला । तो बहुत चि खेळ खेळला रे
लहान थोर अवघीं मारिलीं । खेळ चि मोडूनि गेला रे
ऐसे खेळिये कोटयानुकोटी । गणित नाहीं त्यासी रे
विष्णुदास **नामा** म्हणे वडील हो । पहा देहीं शोधूनि रे ।।१००।।

१०१

पत्रावळी काढी वैकुंठनायक । धांवूनियां शुक आला तेथें
दाटी पाहुनी द्वारीं मानसीं विचारी । जावया भीतरी काय काज
वाहे हा प्रसाद स्वहस्तें अनंत । वेंचोनियां शीत घाली मुखीं
घंटानंद वाजे लक्ष-द्विज-पंक्ति । अक्षयीं वाजती वेळोवेळां
ऐकोनि विस्मित ऋषिसमुदाव । पुसे धर्मराव देवाजीसी

सांगतसे खूण वैकुंठनायक । ब्रह्मनिष्ठ एक आला येथें
तेथूनि उठले धर्म नारायण । बाहेरी येऊन पाहताती
शुकाचिये मिषें व्यासाचा नंदन । सांगतसे खूण जगदीश
धरूनियां करीं नेला तो भीतरीं । **नामा** म्हणे करी पूजा त्याची।।

१०२

ज्ञानराज माझी योग्यांची माउली । जेणें निगमवल्ली प्रगट केली
अध्यात्म-विद्येचे दाविलेंसें रूप । चैतन्याचा दीप उजळिला
छप्पन भाषेचा केलासे गौरव । भवार्णवीं नाव उभारली
श्रवणाचे मिषें बैसावें येऊनि । साम्राज्य-भुवनीं सुखी नांदे
**नामा** म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एकतरी ओंवी अनुभवावी ।।

१०३

सद्गुरूसारिखा सोइरा जिवलग । तोडिला उद्वेग संसारींचा
काय उतराई होऊं कवण्या गुणें । जन्मा नाहीं येणें ऐसें केलें
माझें सुख मज दाखविलें डोळां । दिधली प्रेमकळा नाममुद्रा
डोळियाचा डोळा उघडिला जेणें । लेवविलें लेणें आनंदाचें
**नामा** म्हणे निकी सांपडली सोय । न विसंबे पाय खेचराचे ।।

१०४

आम्ही परीट चोखट । शुद्ध केले खटनट
बोध-साबण लावुनी ठायीं । डाग उडविला पाहीं
शांति-शिळेवरी धुतले । ज्ञानगंगें निर्मळ झाले
परब्रह्म होउनी ठेलों । **नामा** म्हणे सुखरूप झालों ।।

१०५

सुखदुःखें दोन्ही आम्हांसी सारिखीं । प्रतीति पारखी मना आली
अंतर्बाह्य एक ब्रह्म चि कोंदलें । दुजेपण गेलें निपटूनि
त्वचा टाकूनियां सर्प गेला बिळीं । मग ते सांभाळी कोण सांगा
ओघ सांडूनियां गंगा सिंधू ठाये । विसरली धाये खळाळाची
**नामा** म्हणे रात्र जैसी कां पाहली । धारणा ते झाली तैसें आम्हां ॥

१०६

निद्रिस्ताचे सेजे साप कां उर्वशी । पाहों विषयासी तैसे आम्ही
ऐसी कृपा केली माझ्या केशिराजें । प्रतीतीचें भोजें एकसरा
शेण आणि सोनें भासतें समान । रत्न का पाषाण एकरूप
पाया लागो स्वर्ग वरी पडो वाघ । आत्मस्थिती-भंग कदा नोहे
**नामा** म्हणे कोणी निंदा अथवा वंदा झालों ब्रह्मानंदाकार आम्ही ॥

१०७

आकल्प आयुष्य व्हावें तयां कुळा । माझिया सकळां हरीच्या दासा
कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं । ही संतमंडळी सुखी असो
अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासा भाविकांसी
**नामा** म्हणे तयां असावें कल्याण । ज्यां मुखीं निधान पांडुरंग ॥

मराठी ... म. ठा. स्थळप्रत
अनुक्रम........ वि: ..........
क्रमांक .......... नों: दि: ..........

गणेश नमूं तरी तुझा चि देखणा । म्हणूनि नारायणा नमन तुज
सारजा नमूं तरी ते तुझी गायनी । म्हणूनि चक्रपाणी नमन तुज
वेद नमूं तरी तुझा चि स्थापिता । म्हणूनि लक्ष्मीकांता नमन तुज
**नामा** म्हणे भेटी झाली पैं राया । कोण गणी वायां सेवकांसी ॥१०८॥

१०९

विटेवरी उभा दीनांचा कैवारी । भेटाया उभारी दोन्ही बाह्या
गुण-दोष त्यांचे न पाहे चि डोळां । भेटे वेळोवेळां केशिराज
ऐसा दयावंत घेत समाचार । लहान आणि थोर सांभाळितो
सर्वांलागीं देतो समान दर्शन । उभा तो आपण सम पायीं
**नामा** म्हणे तया संतांची आवडी । भेटावया कडाडीं उभा चि असे ॥

११०

वेदासी कानडा श्रुतीसी कानडा । विठ्ठल उघडा पंढरिये
नाम बरवें रूप बरवें । दर्शन बरवें कानडियाचें
**नामा** म्हणे तुझें अवघें चि बरवें । त्याहुनी बरवें प्रेम तुझें ॥

१११

बरवेपणें बरवा बाप मदनाचा । तो स्वामी आमुचा पंढरीराव
उदारपणें उदार दाता त्र्यैलोक्याचा । तो स्वामी आमुचा पंढरीराव
झुंजार आणि शूर अरि त्या दैत्यांचा । तो स्वामी आमुचा पंढरीराव
चतुरपणें चतुर बाप ब्रह्मयाचा । तो स्वामी आमुचा पंढरीराव
पवित्रपणें पवित्र उद्धार तीर्थांचा । तो स्वामी आमुचा पंढरीराव
**नामा** म्हणे आधार सकळां जीवांचा । तो स्वामी आमुचा पंढरीराव ॥

११२

परब्रह्म विश्वाकारें अवतरलें भक्तिकाजा
मूर्ति सुनीळु सांवळी केशिराजु स्वामी माझा ।
मन हें वोवरी असे सुमनाचे चित्रशाळे
दोन्ही चरण सकुमार वरी अष्टदळ कमळें ।
संध्याराग रातले सुनीळ दिशा तळवटीं
ध्वज वज्रांकुश चिह्नें साजती गोमटीं ।
इंदिरा तिथें थोकली तिच्या सुखा नाहीं पारु
ते चरणीं स्थिर झाली म्हणोनि म्हणती लक्ष्मीवरु ।
घवघवीत वांकी चरणीं ब्रीदाचा तोडरु
नख-प्रभा फांकली तिनें लोपला दिनकरु ।
सृष्टि घडीत मोडीत उत्पत्ति स्थिति प्रळय अवघें नवें
तो चतुर्मुख ब्रह्मा चरण पूजितो स्वभावें ।
देवादिदेवा शंभु कैलासींचा राणा
गंगा मस्तकीं धरिली तिचा जन्म अंगुळीं चरणा ।
शेष वर्णितां श्रमला वेद परतले माघारीं
**नामा** म्हणे अरे मना याचे चरण धरीं झडकरी ।।

११३

मुक्ताफळ-नथ नाकीं । चरणीं ल्याली वाळे वांकी
पीतांबरें अंग झांकी । कृष्णम्मा माझी
खांद्यावरी कांबळी । पायघोळ लांबली
पांघरली धाबळी । कृष्णम्मा माझी

गाईपाठीं लागली । पळतां नाहीं भागली
माय बहीण चांगली । कृष्णम्मा माझी
देहुडा पाउलीं । उभी माझी माउली
विश्रांतीची साउली । कृष्णम्मा माझी
उभी नीट विटेवरी । शोभे भींवरेचे तीरीं
**नामयाची** कैवारी । कृष्णम्मा माझी ।।

११४

रात्र काळी घागर काळी । यमुनाजळें हीं काळीं वो माय
बुंथ काळी बिलवर काळी । गळां मोतीं एकावळी काळी वो माय
मी काळी कांचोळी काळी । कांस कांसली ते काळी वो माय
विष्णुदास **नाम्याची** स्वामिनी काळी।कृष्णमूर्ति बहु काळी वो माय।।

११५

गेलिया वृंदावना तेथें देखिला कान्हा
सवंगडियांमाजीं उभा ध्यान लागलें मना
हरिनाम गोड झालें काय सांगों गे माये
गोपाळ वाहती पांवे मन कोठें न राहे
त्याचें मुख साजिरें वो कुंडलें चित्त-चोरें
सांडूनि अमृतधणी लुब्धली चकोरें
सांडूनि ध्रुवमंडळ आली नक्षत्रमाळा
कौस्तुभातळवटीं वैजयंती शोभे गळां
सांडूनि मेघराजु कटिसूत्रीं तळपे विजू
भुलला चतुराननु तया नव्हे उमजु

सांडूनि लक्ष्मी निज गोपाळांसी बोले गुज
अचोज हा चोजवे ना ब्रह्मादिकां सहज

बाजंट धीट मोठी ऐसी कवण असे खिळू
भेदली हरिचरणीं सहज मुरडींव वांकी सोज्वळ

त्याचे पायींचीं नेपुरें वाजती वो गंभीरें
लुब्धलिया पक्षियाती धेनु पाचारी स्वरें

आणिक एक नवल कैसें स्वर्गीं देव झाले पिसे
ब्रह्मादिक उच्छिष्टालागीं देखा जळीं झाले मासे

आणिक एक नवल परी करीं घेउनी शिदोरी
संवगडियां वांटितसे **नामयाचा** स्वामी हरि ।।

११६

अधरीचें अमृत सेविसी एकला रे । काय पुण्य केलें नेणों पांवया
तुळसीच्या माळा शोभती गोपाळा । त्याहूनि आगळा पांवया रे तूं
विष्णुदास **नामा** केशवीं सौरस । उद्धरिला वंश पांवया तुवां ।।

## ( १६ )

सत्यसंकल्पाचा कर्ता जो विश्वाचा । अनाथ जीवांचा मायबाप
पुंडलीकें तया आणिलें रंगणीं । कटावरी पाणि ठेवूनियां
अणुरेणूमाजीं व्यापूनि राहिला । नानात्व तो झाला एकला चि
**नामा** म्हणे वेद ज्यालागीं बोभाय । जोडोनियां पाय उभा ठाके ।।११७।।

११८

तुझिया सत्तेनें वेदांसी बोलणें । सूर्यासी चालणें तुझिया बळें
ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धनी । वर्म हें जाणुनी शरण आलों
मेघीं वरुषावें पर्वतीं बैसावें । वायूं विचरावें सत्ते तुझे
**नामा** म्हणे कांहीं न हाले साचार । प्रभु तूं निर्धार पांडुरंगा ।।

११९

योगियांचें ब्रह्म शून्य व्योमाकार । आमुचें साकार विटेवरी
दाटुगें नागर कटीं ठेवूनि कर । सर्वस्वें उदार भक्तांलागीं
ज्ञानिया सिद्धान्तीं लक्षा परी न ये । आमुची वाट पाहे अनाथांची
जाप्यकाचें जाप्य नाम मंत्रमय । आमुचें भक्तिप्रिय सांसारिका
**नामा** म्हणे जीवें करीन ओंवाळणी । क्षणीं चक्रपाणि दिठावसी ।।

१२०

निर्गुणींचें वैभव आलें भक्तीमुसें । तें हें विठ्ठलवेषें अवतरलें
बरविया बरवें पाहतां नित्य नवें । हृदयीं धरितां निवे त्रिविध ताप
चोविसांवेगळें सहस्राआगळें । निर्गुण निराळें शुद्ध बुद्ध
वेदां मौन्य पडे श्रुतीसी सांकडें । वर्णितां कुवाडें पुराणांसी
भावाचें आळुकें भुललें भक्तिसुखें । दिधलें पुंडलीकें साधूनियां
**नामा** म्हणे आम्हां अनाथांलागूनि । निडारलां नयनीं वाट पाहे।।

१२१

सत्य नित्य युक्त शुद्ध बुद्ध मुक्त । कारणरहित निरंजन
तें आम्हीं देखिलें चर्मचक्षु-दृष्टीं । उभा वाळवंटी पंढरीये
वेदां अगोचर तया सहस्रमुखा । तें झालें पुंडलीका लोभापर
परतलिया श्रुति म्हणती नेति नेति । आम्हां गातां गीतीं सांपडलें
स्वरूपाचा निर्धार बोलती पुराणें । शिणलीं दर्शनें विवादती
**नामा** म्हणे यासी भाव चि कारण । पावावया चरण केशवाचे ।।

१२२

जीव विठ्ठल आत्मा विठ्ठल । परमात्मा विठ्ठल विठ्ठल
जनक विठ्ठल जननी विठ्ठल । सोयरा सांगाती विठ्ठल विठ्ठल
ऐहिक्य विठ्ठल परत्र विठ्ठल । निरंतर तारिता विठ्ठल विठ्ठल
नाम विठ्ठल रूप विठ्ठल । पतितपावन **नामा** विठ्ठल विठ्ठल ।।

१२३

अठ्ठावीस युगें उभा चंद्रभागे । परी पालट चि नेघे पांडुरंग
प्रेमरस-संगें प्रीतीचेनि पांगें । सदा संत-संगें खेळ करी
जो न लभे योगें आणि देह-त्यागें । तो सांपडला सवंगें हृदयीं धरा
योगियांच्या ध्यानीं क्षण एक न रंगे।तो सुखें गोष्टी सांगे **नामयासी** ।।

१२४

ऐसो रामराइ अंतरजामी । जैसे दरपनमाहि बदन पखानी
बसै घटा घट लीप न छीपै । बंधन मुकता जासु न दीसै
पानीमाहि देखु मुखु जैसा । **नामेको** सुआमी बिठलु ऐसा ।।

१२५

बदउ की न होउ माधव मोसिउ
ठाकुर ते जनु जन ते ठाकुरु खेलु परिओ है तोसिउ
आपन देउ देहुरा आपन आप लगावै पूजा
जल ते तरंग तरंग ते है जलु कहन-सुननकउ दूजा
आप हि गावै आप हि नाचै आप बजावै तूरा
कहत **नामदेउ** तू मेरो ठाकुरु जनु ऊरा तू पूरा ।।

१२६

तीनि छंदे खेलु आछै
बाणीएके घर हींगु आछै भैंसरमाथै सींगु गो
देवलमधे लींगु आछै लींगु सींगु हींगु गो ।

तेलीके घर तेलु आछै जंगलमधें बेल गो
मालीके घर केलु आछै केल बेल तेल गो ।
संतांमधे गोविंदु आछै गोकुलमधे सिआम गो
**नामेमधे** रामु आछै राम सिआम गोविंद गो ।।

( १७ )

आम्हां सांपडलें वर्म । करूं भागवत धर्म
अवतार हा भेटला । बोलूं चालूं विसरला
अरे हा भावाचा लंपट । सांडुनी आलासे वैकुंठ
संत-संगतीं साधावा । धरुनी हृदयीं बांधावा
**नामा** म्हणे केउता जाय । आमुचे गळां त्याचे पाय ।।१२७।।

१२८

काय वाणूं आतां पायांचा महिमा । जेथें झाली सीमा बोलायाची
विठोबाचे पाय आठवितां मनीं । गेलें हारपोनि भवभय
पाय ते रमेचें सौभाग्य साजिरें । योगी ऋषीश्वर थोर जेणें
**नामा** म्हणे मनीं पाय सर्व काळ । म्हणोनि सुकाळ आनंदाचा ।।

१२९

तुझे चरणीं सुख अनुपम आहे । हें तूं जाणसी काय पांडुरंगा
चतुरां-शिरोमणि आमुची जननी । जाणते रुक्मिणी जीवनकळा जी
**नामा** म्हणे तुझे चरणींची त्रिपथा । भूषण उमाकांता ऐसें झालें।।

१३०

ब्रह्म अविनाश आनंदघन । त्याहुनी चरण गोड तुझे
ते जीवें न सोडीं अगा पंढरीनाथा । जाणसी तत्त्वतां हृदय माझें
परात्पर वस्तु जे कां अपरंपार । तियेचा सक्षात्कार पाय तुझे

सच्चिदानंदघन जेथें हारपलें मन । त्याहुनी चरण गोड तुझे
**नामा** म्हणे तुझीं पाउलें सुकुमार । तें माझें माहेर विटेवरी ॥

१३१

माझिया रे मनें मज उपदेश केला । तो मज बिंबला हृदयकमळीं
निर्वाणीची एक सांगितली खूण । कैवल्य चरण केशवाचे
वेद शास्त्रें स्मृति आणिक पुराणें । पढोनि जाणणें हें चि सत्य
तप अनुष्ठान करोनि साधन । प्रत्यक्ष विधान चरण हे चि
**नामा** म्हणे मज कळलें अनुभवें । न विसंबें जीवें चरण तुझे ॥

१३२

पतित-पावन माधव बिरदु तेरा
धनि ते वै मुनिजन जिन धिआइउ हरि प्रभु मेरा ।
मेरै माथै लागीले धूरि गोविंद-चरननकी
सुर नर मुनिजन तिनहू ते दूरि ।
दीनका दइआलु माधौ गरब-परहारी
चरन-सरन **नामा** बलि तिहारी ॥

( १८ )

पंढरीचा देव बहुत कोंवळा । सगुण सांवळा सारथि हा
सारथि सर्वांचा साक्षिभूत असे । संकटीं सायासे गजेंद्रासी
गजेंद्रासी रक्षी गणिका उद्धरी । भिल्लीणीचे करीं फळें भक्षी
भक्षी सुदाम्याचे पोहे मुष्टिभरी । **नामा** म्हणे हरि गोड मानी ॥१३३॥

१३४

पाला खाऊनियां धाला बहिणी-घरीं । भक्तालागीं हरि वेडा झाला
सुदाम्याचे पोहे कोरडे चि खाय । मटमटा पाहे चहूंकडे

विदुराच्या कण्या खाय धणीवरी । झाला बळीचे द्वारीं द्वारपाळ
**नामा** म्हणे हरीचे न कळती पवाडे । नेणों भक्तांपुढें वेडा झाला ।।

१३५

देव दयानिधि भक्तांचा कैवारी । नाममात्रें तारी सर्वांलागीं
तया देवराया गांवें हो आवडी । लागे मनीं गोडी सर्वकाळ
नाहीं यातिकुळ उंचनिच भेद । भाव एक शुद्ध पाहतसे
**नामा** म्हणे काय सांगावें नवल । अखंड दंडलें व्योमाकार ।।

१३६

वदनीं तुझें नाम अमृत-संजीवनी । असतां चक्र-पाणि भय कवण
जन्म-मरणाची कायसी मग चिंता । तुझ्या शरणागता पंढरीनाथा
हृदयीं तुझें रूप बिंबलें साचार । तेथें कवण पार संसाराचा
**नामा** म्हणे तुझें नाम वेळोवेळ । म्हणतां कळिकाळ पायां पडे ।।

१३७

संसाराची सोय चुकले बापुडे । केशव मागेंपुढें सांभाळीत
आळीकर नामें खेळे महाद्वारीं । आंतून बाहेरी न वचे कांहीं
संतांतें देखोनि मिठी घाली चरणीं । कुरवंडी करूनि देह टाकी
ऐसे निजबोधें राहिले निवांत । **नामा** राहे एक केशव-चरणीं

१३८

सङ्घा लावी कांसे कुटुंबिया तरी । उतरील पैलतीरीं केशिराज
प्रेमाची ती पेटी बांधोनियां पोटीं । उतरी जगजेठी पांडुरंग
अंगें घाली उडी बुडतिया काढी । ऐसे कल्प कोडी तारियले
तारियले सत्य हा चि पैं निर्धार । **नामा** पैलतीर उतरिला ।।

( १९ )

धरूनि माझी वृत्ति पाहें माझें मुख । मी सांगतों ऐक जननिये
काया वाचा मनें ममत्व माझे ठायीं । तें तूं ठेवीं पायीं विठोबाच्या
मग हा कृपासिंधु न विसंबेल तुज । अनाथांची लाज हा चि राखी
पाडसालागोनि जैसी कुरंगिणी । तैसा रानीं वनीं सांभाळीत
जन्मोनियां माझे बहु लळे केले । अडचणीं सांभाळिलें अनाथ म्हणोनि
**नामा** म्हणे याचे दृढ धरिले चरण । कळिकाळापासून सोडविलें ।।१३९।।

१४०

विठ्ठल माउली कृपेची सांवली । आठवितां घाली प्रेमपान्हा
न सांगतां सर्व जाणे तान्हभूक । जवळीं व्यापक न विसंबे
सुखशांतिरूपें लेवविली अंगी । लागों नेदी धगी संसाराची
कंठीं नाममाळा कीर्तन श्रवणीं । लेवविलीं लेणीं नवविध
नयनीं अंजन सूदलें सांवळें । समाधान झालें सर्व अंग
वासनेची दृष्टि लागेल त्या क्षणीं । उभा चक्रपाणि मागेंपुढें
संतपायीं **नामा** शृंगार-मंडितु । अखंड क्रीडतु महाद्वारीं ।।

१४१

आपुली पदवी सेवकासी द्यावी । तो एक गोसांवी पांडुरंग
भावाचा आळुका भुलला भक्तिसुखा । सांपडला फुका नामासाठीं
प्रेमाचा जिव्हाळा नामाची आवडी । क्षण एक न सोडीं संग त्याचा
**नामा** म्हणे आम्हां दीनांचें माहेर । तो एक उदार पांडुरंग ।।

१४२

जीवनमुक्त केले नामाचे गजरीं । सेवक अधिकारी विठोबाचे
कांहीं उतराई होऊं तुज देवा । उदारा केशवा मायबापा

अंतरीं देऊनि प्रेमाचा जिव्हाळा । मुक्तीचा सोहळा भोगवीसी
**नामा** म्हणे आम्हां दीनांचें माहेर । हृदयीं निरंतर ध्यान करूं ।।

१४३

स्वामी एक व्हावा तुज चि सारिखा । करी निज सेवकां जगद्वंद्य
देऊनि प्रेमभातें पाळिसी तूं बाळें । न करिसी वेगळें क्षणभरी
बळि भीष्म नारद उद्धव रुक्मांगद । हनुमंत प्रह्लाद अंबऋषि
**नामा** म्हणे हें चि देईं जन्मोजन्मीं । मी दास तूं स्वामी केशिराज।।

१४४

तूं अवकाश मी भूमिका । तूं लिंग मी साळुंका
तूं समुद्र मी द्वारिका । स्वयें दोन्ही
तूं वृंदावन मी चिरी । तूं तुळशी मी मंजरी
तूं पांवा मी मोहरी । स्वयें दोन्ही
तूं चांद मी चांदणी । तूं नाग मी पद्मिनी
तूं कृष्ण मी रुक्मिणी । स्वयें दोन्ही
तूं नदी मी थडी । तूं तारूं मी सांगडी
तूं धनुष्य मी भातोडी । स्वयें दोन्ही
तूं वेद मी स्तविता । तूं शास्त्र मी गीता
तूं गंध मी अक्षता । स्वयें दोन्ही
**नामा** म्हणे पुरुषोत्तमा । स्वयें जडलों तुझिया प्रेमा
मी कुडी तूं आत्मा । स्वयें दोन्ही ।।

( २०

अवघी हे पंढरी सुखाची मांदुस । माझा स्वप्रकाश रत्न हरि
धन्य संतजन तेथींचे पारखी । ज्यां झाली ओळखी विठ्ठलनामीं

अनुभवूनि चित्तीं पाहिलें विवेकें । धरिलें पुंडलीकें हृदयकमळीं
त्रिभुवन खेळण प्रेमाचें कोंदण । करूनि भूषण भोगितसे
युगें गेलीं परी पालट चि नाहीं । नित्य शुद्ध पाहीं तेजःपुंज
पाहतां नित्यनवें ध्यातां चित्त निवे । म्हणोनि **नामा** जीवें विसंबेना ॥१४५॥

१४६

पंढरीचें सुख जिहीं अनुभविलें । भावें अनुसरले विठ्ठलपायीं
काया वाचा मनें रंग चरणीं । धरियेला मनीं पांडुरंग
नामाचेनि बळें उडविलीं साधनें । तोडिलीं बंधनें संसाराचीं
मुक्तिपद कोणी नेघे फुकासाठीं । हिंडे वाळवंटीं दीनरूप
योगियांचे घरीं रिघे काकुळती । अव्हेरिलें संतीं म्हणोनियां
ऐसे भक्तराज देवा वंद्य झाले । तें एक राज्य केलें पुंडलीकें
हर्षे निर्भर **नामा** नाचे महाद्वारीं । कीर्ति चराचरीं वर्णितसे ॥

१४७

अवघी हे पंढरी सुखाची वोवरी । अवघा घरोघरीं ब्रह्मानंद
अवघा हा विठ्ठल सुखाचा चि आहे । अनुसरे तो लाहे सर्व सुख
पहावा अवघा नयनीं ऐकावा श्रवणीं । अवघा ध्यावा ध्यानीं अवघ्या मनें
अवघियें आवडी अवघा गावा गीतीं । अवघा सर्वांभूतीं तो चि आहे
अवघा हा जाणावा अवघा हा मानावा । अवघा वाखाणावा अवघी वाचा
अवघा वोळखोनि अवघा गिळिजे मनें । अवघा हा चि होणें म्हणे **नामा** ॥

१४८

पंढरीस जावें जीवन्मुक्त व्हावें । विठ्ठला भेटावें जिवलगा
काया वाचा मन चरणीं ठेवावें । प्रेमसुख घ्यावें सर्वकाळ
सुखाचें साजिरें श्रीमुख पहावें । जीवें उतरावें निंबलोण

बाहेरी भीतरी कैवल्य आघवें । वाचे न बोलवे ब्रह्मानंदु
चिरंजीव **नामा** कंठीं धरी प्राण । करी तुझें ध्यान रात्रंदिवस ॥

१४९

देव गुज सांगे पंढरीसी या रे । प्रेमें चित्तीं घ्या रे नाम माझें
काया वाचा मनें दृढ धरा जीवीं । सर्व मी चालवीं भार त्यांचा
भवसिंधु तारीन घ्या रे माझी भाक । साक्ष पुंडलीक करुनी बोलें
लटकें जरी असे **नामयासी** पुसा । आहे त्या भरंवसा नामीं माझ्या ॥

१५०

पुंडलीकें रचिली पेठ । संत ग्राहिक चोखट
प्रेम सांखरा वांटिती । नेघे त्याचे तोंडीं माती
समतेचे फणस-गरे । आंबे पिकले पडिभरें
नाम द्राक्षाचे घड । अपार रस आले गोड
**नामा** म्हणे भावें घ्यावें । अभक्तांचें मढें जावें ॥

१५१

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा
पुंडलीकाचे भेटी परब्रह्म आलें गा । चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा
जयदेव जयदेव जय पांडुरंगा । रखुमाईवल्लभा राहीच्या वल्लभा
पावे जिवलगा
तुळसीमाळा गळां कर ठेवून कटीं । कांसे पीतांबर कस्तुरी लल्लाटीं
देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनुमंत पुढें उभे राहती
ओंवाळूं आरत्या कुरवंडया येती । चंद्रभागेमाजीं सोडुनियां देती
दिंडया पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णूं मी किती
आषाढी कार्तिकी भक्त जन येती । चंद्रभागेमाजीं स्नानें जे करिती
दर्शनहेळामात्रें तयां होय मुक्ति । केशवासी **नामदेव** भावें ओवाळिती ॥

## (२१)

कृष्ण-भक्तीविण तरला आहे कोण । द्यावा निवडून एक तरी
कार्यकारण हा लटिका चि शीण । वर्म न कळून वायां गेले
**नामा** म्हणे माझी खेचरमाउली । कृपेनें दाविली वाट मज।।१५२।।

१५३

पृथ्वी ध्यासी तरी पृथ्वी चि होसी । परी केशव न होसी अरे मना
आप ध्यासी तरी आप चि होसी । परी केशव न होसी अरे मना
तेज ध्यासी तरी तेज चि होसी । परी केशव न होसी अरे मना
वायु ध्यासी तरी वायु चि होसी । परी केशव न होसी अरे मना
आकाश ध्यासी तरी आकाश चि होसी।परी केशव न होसी अरे मना
**नामा** म्हणे जरी केशवासी ध्यासी । तरी चि केशव होसी अरे मना।।

१५४

हरिकथा-श्रवण श्रवणाचेनि द्वारें । माझिया दातारें केशवें दिलें
रूपाचें सुख नेत्राचेनि द्वारें । माझिया दातारें केशवें दिलें
तीर्थाचें सुख चरणाचेनि द्वारें । माझिया दातारें केशवें दिलें
पूजनाचें सुख कराचेनि द्वारें । माझिया दातारें केशवें दिलें
**नामा** म्हणे ऐसे जयाचे उपकार । विठ्ठल दातार विसरले ।।

१५५

पुलकधर्म रोमांच नाहीं जंव उठले । सजळ नाहीं झाले नयन जंव
हरिभक्तीचें सुख कळलें जे म्हणती । लटिके बोलिजेती उभय लोकीं
ऐसा भक्तिप्रेमा देईं जी देवा । सर्व भावें सेवा घडे तुझी
श्रवणीं ऐकतां नाम वाचे भव बोले । नाहीं सुखावलें मन त्याचें
श्रीहरीचें नाम म्हणवितां न म्हणे । सहज उच्चारणें कैचें त्यासी

दर्दुराचे परी जिह्वा वटवटी । नाम सांडोनि गोष्टी राज्याची करी
देवाच्या मूर्ति संत महंत देखोनि । न वचे लोटांगणीं भावें त्यांसी
न लावी त्यांचें रज टकमकां पाहत । बुजगावण जैसें सेत राखे तैसे
ऐसे कैक प्राणी आहेत मूढमति । हित सांगतां चित्तीं दुःख वाटे
**नामा** म्हणे केशवा मी तुझें दीन । नेणें तुजवांचोन आन दुजा।।

१५६

बोलवरी बोलती । श्रुति वाखाणिती
हरि पाविजे ती गति । वेगळी असे
तुज न पवे गा तें स्वप्न । हरि शब्द एक चि ब्रह्म
पाविजे तें वर्म । वेगळें असे
एक जाणीव खटपट । करिती ते सैराट
हरि पाविजे ती वाट । वेगळी असे
जिहीं तुज जाणितलें । तिहीं मौन धरलें
**नामा** म्हणे ते पावले । भक्तियोगें।।

१५७

अभ्यासिले वेद झाला शास्त्रबोध । साधिल्या विविध नाना कळा
प्रेमाचा जिव्हाळा जंव नाहीं अंतरीं । तंव कैसा श्रीहरि करील कृपा
अनंत ह्या मूर्ति पाहिल्या लोचनीं । त्यांतील कोण ध्यानीं प्रतिबिंबली
स्वप्नींचियापरी देखसी आभास । न धरी च विश्वास चित्त तुझें
दृष्टीचें देखणें श्रवणींचें ऐकणें । मनाचें बैसणें एक होय
**नामा** म्हणे तरी विठो येऊनि भेटे । काया चि पालटे कैवल्य होय।।

( २२ )

भक्ति-प्रतापें मी पावलों सुपंथ । सफळ निश्चित परमार्थ
देव सर्वांभूतीं असतां प्रगट । निर्वाणीं चोखट भक्ति जाण
जप तप ध्यान न लगे साधन । भक्ति ते कारण **नामा** म्हणे।।१५८।।

१५९

वावडी दुरीच्या दुरी उडतसे अंबरीं । हातीं असे दोरी परी लक्ष तेथें
दुडीवरी दुडी पाण्या निघाली गुजरी । चाले मोकळ्या करीं परी लक्ष तेथे
धनलोभ्यानें धन ठेवियलें दूरी । वर्ते चराचरीं परी लक्ष तेथें
**नामा** म्हणे असावें भलतियां व्यापारीं । लक्ष सर्वेश्वरीं ठेवूनियां ।।

१६०

विठ्ठलाचें नाम जे माउलीचे ओठीं । विठो तिचे पोटीं गर्भवासी
जयाचिये कुळीं पंढरीची वारी । विठो त्याचे घरीं बाळलीला
**नामा** म्हणे जिह्वे काढीन मी रवा । असत्य केशवा वचन होतां ।।

१६१

सोयरा सुखाचा विसांवा भक्तांचा । विठोबा निजांचा मायबाप
कृपाळु दीनाचा बडिवार नामाचा । तोडर ब्रीदाचा शोभे तया
काया वाचा मनें संग धरा त्याचा । अनंत जन्मींचा हरे शीण
**नामा** म्हणे विठो अनाथा कोंवसा । तारील भरंवसा आहे मज ।।

१६२

अग्नि जाळी तरी न जळती पांडव । हृदयीं माधव म्हणोनियां
अग्नि जाळी तरी न जळती गोपाळ । हृदयीं देवकीबाळ म्हणोनियां
अग्नि जाळी तरी न जळे हनुमंत । हृदयीं सीताकांत म्हणोनियां

अग्नि जाळी तरी न जळे पैं सीता । हृदयीं रघुनाथ म्हणोनियां
अग्नि जाळी तरी न जळे प्रह्लाद । हृदयीं गोविंद म्हणोनियां
**नामा** म्हणे स्वामी स्मरावे गोविंदा । चुके अग्निबाधा संसाराची

१६३

अवघी चित्तवृत्ति एकवटोनि जेणें । अवघा धरिला मनें पांडुरंग
अवघें सुख एक तयासी फावलें । अवघे सफळ झाले जन्म त्याचे
अवघा इष्ट मित्र बंधु माता पिता । केला आवडता पांडुरंग
**नामा** म्हणे ऐसे अवघे संप्रदाय । मिळोनि धरा पाय विठोबाचे ।।

१६४

दूधु कटौरे गडवे पानी । कपिल गाइ नामै दुहि आनी
दूधु पीउ गोविंदेराइ । दूधु पीउ मेरो मनु पतीआइ
नाहीं त घरको बाप रिसाइ
सोइन कटोरी अमृत भरी । लै नामै हरिआगै धरी
एकु भगत मेरे हिरदै बसै । नामे देखि नराइनु हसै
दूधु पीआइ भगतु घरि गइआ । **नामे** हरिका दरसनु भइआ ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .. .................... वि: ....... ...........
क्रमांक ......................... नों: दि: ................

# भाग २ रा

## ५ साधकाची तळमळ : पूर्वावस्था

### ( २३ )

मज चालतां आयुष्यपंथें । तारुण्यवन पातलें तेथें
मदमत्सरादि श्वापदें बहुतें । आलीं कळकाळीत मजपाशीं
तीं धांवतीं पाठोपाठीं । पाहें तंव विषयाचे घाटीं
कामक्रोध-व्याघ्रांची दाटी । देखोनि पोटीं रिघाले पाय
मग स्वधर्ममार्गीं रिघालों । तंव अहंकार-तस्करें आकळिलों
राहें राहें म्हणूनि उभा केलों । तेणें अंतरलों स्वामिया
जंव क्षण एक उघडिले डोळे । पाहें तंव कंठ व्यापिला व्याळें
मायामोह-सर्पें डंखिलें । त्याचिया गरळें झळंबलों
जंव न पावेल शेंवटील लहरी । तंव धांव धांव उपाव करीं
विष्णुदास **नामा** धांवें पुकारी । माझा कैवारी केशिराज।।१६५।।

१६६

तुझ्या चरणाचें तुटतां अनुसंधान । नेलें माझें मन षड्वर्गीं
धांव गा विठ्ठला सोडवीं आपुला दास । थोर कासावीस केलें बापा
काम कुळाचार क्रोध हा अनिवार ।मदें निरंतर भ्रांत केलें
मत्सरें तुजसी दुरावलें देवा ।लोभें केला गोंवा गर्भवासीं
दंभ रसातळीं जातसे घेऊनि । विश्वचक्षु होऊनि पाहसी कैसा
**नामा** म्हणे मज तुझा चि भरंवसा । अनाथा कोंवसा होसी देवा।।

१६७

वायां ताडातोडी केली माझ्या मनें । राहिलों लपोन तुझे पायीं
नको नको मज कल्पनेचा संग । आलासे उद्वेग नारायणा
काम क्रोध लोभ पाठी लागों येती । झणीं त्यांचे हातीं देसी देवा
**नामा** म्हणे होसी अनाथा कैवारी । ब्रीदें चराचरीं वर्णिताती ।।

१६८

लोभ-लहरि अति नीझर बाजै । काइआ डूबै केसवा
संसारु-समुंदे तारि गोविंदे । तारि लै बाप बीठला
अनिल बेडा हउ खेवि न साकउ । तेरा पारु न पाइआ बीठुला
होहु दइआलु सतिगुरु मेलि तू । मोकउ परि उतारे केसवा
**नामा** कहै हउ तरि भी न जानउ । मोकउ बाह देहि बाह देहि बीठुला।।

१६९

संसारसागरीं पडलों महापूरीं । सोडवण करीं देवराया
नामाची सांगडी देऊनियां मातें । वैकुंठावरुतें नेउनि घालीं
कामक्रोध मगर करिती माझा ग्रास । झणीं तू उदास होसी देवा
**नामा** म्हणे झणीं मोकलिसी मातें । नाम तुझें सरतें धरिलें एक ।।

१७०

माझे मनीं ऐसें होतसे गा देवा । देह समर्पावा तुझे पायीं
तंव या मायामोहें मजसी केला हेवा । लोटियलें देवा भवजळीं
आशानदीपूरीं वाहविलें दूरी । काढीं मज हरी कृपाळुवा
थडिये उभया धांव गा श्रीहरी । हानि झाली थोरी सर्व गेलें
**नामा** म्हणे भजनेंविण कोरडा गळा । नेतो रसातळा क्रोध-मीन ।।

१७१

ममता तुटेना मज केशिराजा । आंगीं भाव दुजा लागे पाठीं
शरीरीं तितिक्षा नाहीं क्षमा शांति । यालागीं श्रीपती वायां गेलों
**नामा** म्हणे देवा तारिसी पतिता । म्हणोनियां सत्ता केली आम्हीं ॥

१७२

तापत्रय–अग्नीची जळतसे शेगडी । आहाळोनि कोरडी झाली काया
केव्हां करुणाघना वोळसी अंबरीं । निवविसी नरहरी कृपादृष्टी
शोक-मोहाचिया झळंबलों ज्वाळीं । क्रोधाचे काजळीं पोळतसें
चिंतेचा वोणवा लागला चहूंकडा । जातों तळाबुडा धांव देवा
धांव धांव करुणाघना तुजविण । **नामा** म्हणे प्राण जातो माझा ॥

१७३

वासरूं भोंवे खुंटियाभोंवतें । आप आपणियातें गोंवियेलें
तैसी परी मज झाली गा देवा । गुंतलों मी भावा लटकिया
**नामा** म्हणे केशवा तोडीं कां बंधनें । मी एक पोसणें भक्त तुझा ॥

( २४ )

संसारींच्या आह्यां आहाळलों भारी । निववीं गा श्रीहरी अमृतदृष्टी
अनाथ अपराधी दुर्बळ दुराचारी । कृपाळुवा हरी तारीं मज
**नामा** म्हणे विठो कृपेचा कोंवळा । जाणसी कळवळा अनाथांचा ॥ १७४ ॥

१७५

आरुष साबडें नेणें कांहीं वेडें । जन्मोनि सांकडें केलें तुज
जाणसी तें करी कृपाळुवा हरी । लाज सर्वांपरी आहे तुज
मी तंव अपराधी आहें लक्षकोटि । परी म्हणवितों जगजेठी दास तुझा
**नामा** म्हणे मज मोकलिसी झणीं । अनाथ म्हणऊनि पाळीं देवा ॥

१७६

अपराधांची कोडी हें चि माझी जोडी। पतित-पावन प्रौढी तुझी देवा
माझिया निदैवें ऐसें चि घडलें। तूं तंव आपुलें न संडिसी
सहस्र अपराध घालीं माझे पोटीं। तारीं जगजेठी म्हणे **नामा**।

१७७

बहु जन्मांशेवटीं तुजशीं झाली भेटी। बहु मी हिंपुटी झालों थोर
बहुतां आसक्त बहुतां ओळंगणा। बहुत विटंबना झाली माझी
बहुत काळ गेले बहु अन्याय केले। बहु नाहीं जोडिलें नाम तुझें
ऐसा **मी अपराधी** पावें कृपानिधी। बहु संतांसन्निधीं ठेवीं **नामा**।।

१७८

वासनेचा फांसा पडिला माझे कंठीं। हिंडलों जगजेठी नाना देहीं
सोडवीं गा देवा दीन दयानिधी। मी एक अपराधी दास तुझा
शरण आलियाचे न पाहसी अवगुण। कृपेचें लक्षण तुज साजे
त्रिभुवनीं समर्थ उदार मनाचा। कृपाळु दीनांचा ब्रीद तुझें
गजेंद्रा-गणिकेची राखिली तुवां लाज। उद्धरिला द्विज अजामेळ
**नामा** म्हणे देवा अव्हेरिसी मज। जगीं थोर लाज येईल तुज।।

१७९

काय गुणदोष माझे विचारिसी। आहें मी तों राशी अपराधांची
अंगुष्ठापासोनि मस्तकापर्यंत। अखंड दुश्चित आचरलों
स्वप्नीं देवा तुझी नाहीं घडली भक्ति। पुससी विरक्ति कोठोनियां
तूं चि माझा गुरु तूं चि तारीं स्वामी। सकळ-अंतर्यामी गाऊं तुज
**नामा** म्हणे माझें चुकवीं जन्ममरण। नको करूं शीण पांडुरंगा।

९३४७८

१८०

अमृताहुनी गोड नाम तुझें देवा । मन माझें केशवा कां बा नेघे
सांग पंढरीराया काय करूं यासी । कां रूप ध्यानासी न ये तुझें
कीर्तनीं बैसतां निद्रें नागविलें । मन माझें गुंतलें विषयसुखा
हरिदास गर्जती हरिनाम-किर्ति । नये माझ्या चित्तीं **नामा** म्हणे।।

( २५ )

जननिये जिवलगे ये वो पांडुरंगे । शिणलों भेटी दे गे एक वेळां
त्राहे त्राहे त्राहे कृपादृष्टी पाहे । येऊनियां राहें हृदयामाजीं
वासनेच्या संगें शिणलें माझें चित्त । विषयाचे आघात पडती वरी
नाहीं तुझी सेवा केली मनोधर्में । संसार-संभ्रमें भ्रांत सदा
नाहीं तुझें नाम गाइलें आवडी । वाळली कुवंडी त्रिविध तापें
**नामा** म्हणे आई धांवें लवलाहीं । बुडतों चिंताडोहीं काढीं मज ।।१८१।।

१८२

तूं माय माउली म्हणोनि आस केली । विठ्ठले पाहिली वाट तुझी
मज कां मोकलिलें कवणा निरविलें । कठिण कैसें झालें हृदय तुझें
तुजविण जिवलग मज कोण होईल । जो माझें जाणेल जडभारी
आम्ही अपराधी तुझें शरणागत । तुजविण माझें हित कोण करी
करुणाकल्लोळ वाणी अमृतसंजीवनी । चिंतिल्या निर्वाणीं पाव वेगें
**नामा** म्हणे तुजविण झालों परदेशी । केव्हां सांभाळिसी अनाथनाथा ।।

१८३

येईं वो विठ्ठले भक्तजनवत्सले । करुणा-कल्लोळ पांडुरंगे
जलजलदवर्णे पीतांबर-परिधाने । येईं उद्धरणे केशीराजे
**नामा** म्हणे तूं विश्वाची जननी । क्षिराब्धि-निवासिनी जगदंबे ।।

१८४

अग्नीमाजीं पडे बाळु माता धांवे कनवाळु
तैसा धांवें माझिया काजा । अंकिला मी दास तुझा
वणवा लागलासे वनीं । पाडस चिंतीत हरिणी
**नामा** म्हणे मेघा जैसा । विनवितो चातक तैसा ।।

१८५

नेत्र तान्हेले पाज पाणी । पंढरीचे माय-बहिणी
बाळ पालखी करी सोर । माते आला निद्राभर
जागी न होसी गे माय । प्राण जाती करूं काय
**नामा** आला लोटांगणीं । पाईं घालतो लोळणी ।।

१८६

तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा । पाजीं प्रेम पान्हा पांडुरंगे
तूं माझी गाउली मी तुझें वासरूं । नको पान्हा चोरूं पांडुरंगे
तूं माझी हरिणी मी तुझें पाडस । तोडीं भव-पाश पांडुरंगे
तूं माझी पक्षिणी मी तुझें अंड-ज । चारा घालीं मज पांडुरंगे
**नामा** म्हणे होसी भक्तीचा वल्लभ । मागें पुढें उभा सांभाळिसी ।।

१८७

येईं वो कृपावंते अनाथांचे नाथे । निवारीं भवव्यथे पांडुरंगे
मी बाळक भुकाळु तूं माउली कृपाळु । करी माझा सांभाळु पांडुरंगे
मी देह तूं चैतन्य मी क्षुधार्थ तूं अन्न । मी तृषार्त तूं जीवन पांडुरंगे
मी चकोर तूं चंद्र मी सरिता तूं सागर । मी याचक तूं दातार पांडुरंगे
मी धन-लोभी शुद्ध तूं पूर्ण कनक-कुंभ । मी मगर तूं अंभ पांडुरंगे
मी चातक तूं मेघ मी प्रवृत्ति तूं बोध । मी शुष्क नदी तूं ओघ पांडुरंगे

मी दोषी तूं तारक मी भृत्य तूं नायक । मी प्रजा तूं पाळक पांडुरंगे
मी पाडस तूं कुरंगिणी मी अंडज तूं पक्षिणी । मी अपत्य तूं जननी पांडुरंगे
मी भक्ति तूं निजसोय मी ध्यान तूं ध्येय । मी आडळ तूं साह्य पांडुरंगे
शीघ्र येईं वो श्रीरंगे भक्तमानस-रंगे । प्रेम-पान्हा दे गे **नामदेवा** ।।

१८८

पक्षिणी प्रभातीं चारियासी जाये । पिलूं वाट पाहे उपवासी
तैसें माझें मन करी वो तुझी आस । चरण रात्रंदिवस चिंतीतसे
तान्हें वत्स घरीं बांधलेसें देवा । तया हृदयीं धांवा माउलीचा
**नामा** म्हणे केशवा तूं माझा सोइ्रा । झणीं मज अव्हेरा अनाथनाथा ।।

( २६ )

जयवंत असो लक्षुमीचा चूडा । धांवत दुडदुडा त्वां बा यावें
बैसावयालागीं नको घेऊं घोडा । धांवत दुडदुडा त्वां बा यावें
अडखळूनि पडसी नको घालूं जोडा । धांवत दुडदुडा त्वां बा यावें
येथें येतेवेळीं आळस तुम्ही सोडा । बाहतसे वेडा **नामदेव** ।।१८९।।

१९०

येवढा वेळ कां लाविला । कोण्या भक्तानें गोंविला
झकडरी येईं गा विठ्ठला । कंठ आळवितां सोकला
वाट पाहें दाही दिशा । जीवीं धरूनि भरंवसा
कधीं येईल हरि माझा । आलिंगील चहूं भुजां
**नामा** गहिंवरें दाटला । पूर धरणिये लोटला ।।

१९१

देशीं परदेशी झालों तुजविण । माझें समाधान कोण करी
चातका-चकोरापरी पाहें वास । तूं कां रे उदास पांडुरंगा
**नामा** म्हणे चित्त देईं माझ्या बोला । जीव तो उलला निघों पाहे ।।

१९२

केधवां भेटसी माझिया जिवलगा । ये गा पांडुरंगा मायबापा
आशा धरून पोटीं दिवस लेखीं बोटीं । प्राण ठेवुनी कंठीं वाट पाहें
चित्त निरंतर ठेवुनी महाद्वारीं । अखंड पंढरी हृदयीं वसे
श्रीमुख साजिरें कुंडलें गोमटीं । तेथें माझी दृष्टि बैसलीसे
आंसवें दाटुनी पसरूनि बाहे । **नामा** वाट पाहे विठ्ठलाची ।।

१९३

भेटीचें आर्त उत्कंठित चित्त । न राहे निवांत कवणे ठाईं
जया देखें तया पुसें हे चि मात । कैं मज पंढरीनाथ बोलावील
माहेरींची आस दसरा दिवाळी । बाहे ठेवुनी निढळीं वाट पाहें
कृपेचा सागरु विठो लोभापरू । परी कां विसरु झाला त्यासी
विटेसहित चरण देईन आलिंगन । तेणें माझी तनु वोल्हावेल
ऐसा निलाजिरा **नामा** कंठीं धरोनि प्राण । करितों तुझें ध्यान रात्रंदिवस।।

( २७ )

माझे मनोरथ पूर्ण कीजे देवा । केशवा माधवा नारायणा
नाहीं नाहीं मज आणिक सोयरा । न करीं अव्हेरा पांडुरंगा
अनाथांचा नाथ होसी तूं दयाळा । किती वेळोवेळां प्रार्थूं आतां
**नामा** म्हणे जीव होतो कासावीस । केली तुझी आस आतांवरी ।।१९४।।

१९५

काय पांडुरंगा सांग म्यां करावें । शरण कोणा जावें तुम्हांविण
पाहतांना वाट भागले लोचन । कठिण चि मन केलें तुवां
ऐकिली म्यां कानीं कीर्ति तुझी देवा । उठलासे हेवा त्या चि गुणें

अनाथ अन्यायी काय मी करीन । दयावंता खूण सांगसी तूं
**नामा** म्हणे आस पूर्ण कीजे देवा । रूपडें दाखवा नेटेंपाटें ।।

१९६

तुवां येथें यावें कीं मज तेथें न्यावें । खंती माझ्या जीवें मांडियेली
माझें तुजविण येथें नाहीं कोणी । विचारावें मनीं पांडुरंगा
**नामा** म्हणे वेगीं यावें करुणाघना । जातो माझा प्राण तुजलागीं ।।

१९७

रात्रंदिवस खंती वाटे माझ्या जीवीं । अनुदिनीं आठवीं चरण तुझे
ने रे पांडुरंगा आपुलिया गांवा । तूं माझा विसांवा जीवलग
मी एक बापुडें रंकाहूनि रंक । त्रिभुवन नायक कीर्ति तुझी
मी तुझें पोसणें दास पैं दुर्बळ । तूं दीन-वत्सल स्वामी माझा
तुझे मी अनाथ चरणीं ठेवीं माथा । सांभाळीं समर्था ब्रीद तुझें
**नामा** म्हणे विठो झालों कासाविस । पुरवीं माझी आस मायबापा ।।

१९८

कां हो माझी सांडी केली हृषीकेशी । आम्ही कोणापाशीं तोंड वासूं
नित्य तुज देवा यावें काकुळती । काय या संचितीं लिहिलें माझ्या
ब्रीदाचा तोडर गर्जे त्रिभुवनीं । तूं चि एक धनी त्रैलोक्याचा
समूळ घेतला पृथिवीचा भार । माझा चि जोंजार काय तुज
नको पाहूं अंत पांडुरंगे आई । **नामा** हरि-पाईं मिठी घाली ।।

१९९

माझी कोण गति सांगा पंढरीनाथा । तारिसी अनाथा कीं बुडविसी
मनापासोनियां सांग मजप्रति । पुसें काकुळती जीवींचिया
न बोलसी कां रे धरिला अबोला । कोणासी विठ्ठला शरण जाऊं

कोणासी सांकडें घालावें हें सांग । नको करूं राग दीनावरी
बालकासी जैसी एकली चि माय । तैसे तुझे पाय आम्हांलागीं
**नामा** म्हणे देवा अनाथांच्या नाथा । कृपाळुवा कांता रखुमाईच्या ।।

२००

काय करूं आतां देवा विश्वंभरा । मजलागीं थारा नाहीं कोठें
उबगती सोयरींधायरीं समस्त । काय करूं अंत पाहसी माझा
तूं चि माता पिता गुरु बंधु होसी । जाऊं मी कोणासी शरण आतां
पायीं थारा मागें **नाम्याची** विनंति । चित्त द्या श्रीपती आतां वेगें ।।

२०१

तत्त्व पुसावया गेलों वेदज्ञांसी । तंव भरलें त्यांपासीं विधि-निषेध
तयां समाधान नुपजे कोणे काळीं । अहंकार बळी झाला तेथें
स्वरूप पुसावया गेलों शास्त्रज्ञांसी । तंव भरले त्यांपासीं भेदाभेद
एक एकाच्या न मिळती मतासी । भ्रांत गर्व-राशि भुलले सदा
पुराणिकांसी पुसूं स्वरूपाची स्थिति । तंव त्यांसी विश्रांति नाहीं कोठें
विषयीं ठेवूनि मन सांगती ब्रह्म-ज्ञान । तेणें समाधान नुपजे कदा
हरिदासांसी पुसूं भक्तीचा उपाव । तंव तयांपासीं भाव नाहीं कोठें
वाचेनें सांगती नामाचा बडिवार । विषयीं पडिभर कदाकाळीं
ऐसें विचारितां बहुत भागलों । म्हणोनि शरण आलों पांडुरंगा
भयभीत झालों संसार करितां । **नामा** म्हणे आतां तारीं मज ।।

## ६ साधकाची तळमळ : उत्तरावस्था

### ( २८ )

आधीं मी लटिका वरी लटिकी तुझी माया । भजन ऐसिया पाहसी काय
जाणतां नेणतां नाम तुझें देवा । गाईन केशवा तारीं मज
विषयीं आसक्त भ्रांत माझें मन । कैसें तुझें ध्यान घडेल यासी
**नामा** म्हणे आतां जाणसी तें करीं । पतितपावन हरी नाम तुझें ।।२०२।।

२०३

लटिका मी गाणु लटिका मी नाचणु । संतांसी देखून लोचल लावीं
लटिका माझा भाव लटिकी माझी भक्ति । तूं तव श्रीपती कृपासिंधु
लटिकी माझी क्रिया लटिकें माझें कर्म । परी हें तुझें नाम गातु असें
लटिकें माझें ध्यान लटिकें माझें ज्ञान । तूं तव सहजगुण सत्यरूप
लटिकें वत्सप्रेम धेनु हे स्वीकारी । तैसें मज करीं म्हणे **नामा** ।।

२०४

लटिकें तरी गायें तुझें चि मी नाम । लटिकें तरी प्रेम तुझें चि आणि
सहजें चि लटिकें असे माझे ठायीं । तुझिया पालट नाहीं साचपणा
लटिकें तरी हरी करीं तुझें ध्यान । लटिकें माझें मन तुज चि चिंती
लटिका तरी म्हणवीं तुझा चि मी दास । परी नामीं विश्वास सत्य आहे
ऐसें लटिकें माझें सफळ करीं देवा । **नामा** म्हणे केशवा विनवीत आहें ।।

२०५

तुझा विष्णुदास म्हणताती जगीं । नाहीं माझे अंगीं प्रेमभावो
तेणें थोर लाज वाटे पंढरीराया । ये माझ्या हृदया एक वेळां

द्वैताद्वैतभाव आहे माझे ठायीं । अनुभव नाहीं स्वरूपाचा
**नामा** म्हणे माझा उजळ करीं माथा । भेटी देउनी संतां निरवीं मज ॥

२०६

निंदा आणि स्तुति तुझी चि करणें । परी आणिकांचे न घेणें गुणदोष
वैर अथवा सख्य तुझिये चि ठायीं । परी न पडो हृदयीं विसर तुझा
जिणें अथवा मरणें तुझिये चि द्वारीं । उदास नरहरी करिसी झणीं
**नामा** म्हणे थोर शिणलों पंढरीनाथा । स्वामीचे नेणतां प्रेमसुख ॥

२०७

सहस्र नामांची घालितां लाखोली । तरला हा कोळी वाल्मीक तो
पुराणप्रसिद्ध गोष्टी ह्या ऐकाव्या । प्रत्यक्ष देखाव्या कोणे ठायीं
अंगें अनुभवा आपण आणाव्या । तरी चि वानाव्या लोकांपुढें
नाहीं तरी मज वाटे कानकोंडें । सुधा म्हणे तोंडें चवी नेणें
**नामा** म्हणे असे पोटामध्यें भूक । तृप्तीचें तें सुख बोलों कैसें ॥

२०८

तूं माय माउली आस केली थोरी । वास निरंतरीं पंढरिये
रूपें तीं दाखवीं एक वेळां मज । धरूं नको लाज केशिराजा
आपणासमान करीं कोणे काळीं । तंव वनमाळी देव म्हणूं
**नामा** म्हणे तुज भक्तिचियें पिसें । पुरविसी आस दुर्बळाची ॥

( २९ )

समर्थाचें बाळ पांघरे वाकळ । हांसती सकळ लाज कोणा
दैव असतां दैन्य उरे कैचें बापा । आम्हांसी तूं कां पां विसरलासी
ऐसा तूं अविनाश त्रिभूवनांचा राजा । **नामा** म्हणे माझा तूंचि स्वामी।२०९

२१०

अपत्याचें हित कीजे त्या जनकें । जरी वेडें मुकें झालें देवा
तैसें मी पोसणें तुझें जिवलग । अंतरींचें सांग गूज कांहीं
राखीन मी नांव तुझें सर्वभावें । चित्त वित्त जीव देईन पायीं
जरी देवा हीन म्हणशील मज । **नामा** म्हणे लाज येईल कोणा ।

२११

तुझें रूप माझ्या दाखवीं मनातें । मग तुझ्या चरणांतें न विसंबें
कां मज शिणविशी थोडिया कारणें । काय तुझें उणें होईल देवा
चातकाची तहान पुरवी जळधर । काय त्याचें सरे थोरपण
चंद्र चकोराचा पुरवी सोहळा । काय त्याच्या कळा न्यून होती
कूर्मी अवलोकी आपुलिया बाळा । काय तिच्या डोळ्यां दृष्टि नासे
**नामा** म्हणे देवा तुझा चि भरंवसा । अनाथा कोंवसा होसी तूं चि ।।

२१२

अनाथ अनाथ म्हणती मातें । अनाथ-नाथ म्हणती तूंतें
आपुलें ब्रीद साच करीं । भेट मज एकवेळ मुरारी
पतित पतित म्हणती मातें । पतित-पावन म्हणती तूंतें
आर्त आर्त म्हणती मातें । आर्त-परायण म्हणती तूंतें
**नामा** म्हणे ऐकें सुजाणा । नाइकसी तरी लाज कवणा ।।

२१३

देवा आम्हीं तुज दिलें थोरपण । मानीं हें वचन सत्य माझें
पतित अमंगळ तुज झालों साह्य । विचारूनि पाहें खरेंखोटें
रोग व्याधि पीडा जनांसी नसतां । कोण पाचारिता वैद्यालागीं
कल्पनेचें भूत झडपी या संसारीं । माने पंचाक्षरी पाचारितां
**नामा** म्हणे विठो दैव येतां घरा । नको लावूं दारा पांडुरंगा ।।

२१४

आम्हीं शरणागतीं केलासी सरता । ये-ह्वीं अनंता कोण जाणे
वेदशास्त्रपुराणीं उबगोनि सांडिलासी । तो आम्हीं धरिलासी हृदयकमळीं
चतुरां शिरोमणि अहो केशिराजा । अंगीकार तुझा केला आम्हीं
सहस्र नामीं झालासी संपन्न । तरी हें हि भूषण आमुचें चि
ये-ह्वीं त्या नामांची कोण जाणे सीमा । पाहें मेघश्यामा विचारोनि
होतासी क्षीरसागरीं अनाथाचे परी । लक्ष्मी तेथें करी चरणसेवा
ते हि तंव जाण आमुची जननी । तूं तियेवांचोनि शोभसी कैसा
तुज नाहीं नाम रूप जाति कुळ । अनादिचें मूळ म्हणती तूज
आम्ही भक्त तरी तूं भक्तवत्सल । ऐसा प्रगट बोल जगामाजीं
ऐसी आमुचेनि भोगिसी थोरीव । आमुचा जीवभाव तुझे ठायीं
**नामा** म्हणे केशवा जरी होसी जाणता । तरी या बोला उचिता प्रेम देईं ॥

२१५

देवा माझें मन करूनि स्वाधीन । निमोली स्वामीपण भोगिसी ना
फुकाचा कामारा वोळगे निरंतर । न घलीं तुज भार कल्पनेचा
तुज न लगे देणें मज नाहीं सांगणें । असेन अनुसंधानें चरणांचेनि
**नामा** म्हणे केशवा तूं सर्व जाणता । समयींच्या उचिता चुकों नको ॥

२१६

उदाराचा राणा म्हणविसी आपणा । सांग त्वां कवणा काय दिलें
उचिता उचित देसी पंढरीनाथा । न बोलों सर्वथा वर्म तुझीं
न घेतां न देसी आपुलें हि कोणा । प्रौढी नारायणा न बोलावी
माझें सर्व घेईं तुझें नको कांहीं । मनोरथाची नाहीं चाड मज
**नामा** म्हणे केशवा जन्मजन्मांतरीं । करीन मी हरि सेवा-ऋण ॥

२१७

जन्ममरणाचें मज भय दाविसी । तें म्यां हृषीकेशी स्वीकारलें
आतां माझी चिंता तुज कां पंढरीनाथा । असों दे भलता भलते ठायीं
सुखदुःख भोगणें माझें मी चि जाणें । तुज तंव सोसणें न लगे कांहीं
**नामा** म्हणे माझे हे चि मनोरथ । होईन शरणागत जन्मोजन्मीं ॥

२१८

पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा
पतित-पावन न होसी म्हणुनी जातों माघारा ।
सोडीं देवा ब्रीद आतां न होसी अभिमानी
पतितपावन नाम तुझें ठेवियलें कोणीं ।
घेसी तेव्हां देसी ऐसा अससी उदार
काय धरूं मी देवा तुझें कृपणाचें द्वार ।
उच्छिष्टाचीं शितें देवा न टाकिसी बाहेरी
कोणी दिधली एवढी तुज भूषणाची थोरी ।
**नामा** म्हणे देवा तुझें न लगे मज कांहीं
प्रेम असों दे चित्तीं म्हणुनी लागतसें पायीं ॥

( ३० )

उलीसा प्रपंच परी हा लटिका । तेणें तुज व्यापका झांकियेलें
तैसियाच्या मज घालोनियां खेंवा । स्वामिद्रोही देवा करिसी कैसा
मेरूचिया गळां बांधोनि मशक । पाहसी कौतुक अनाथनाथा
**नामा** म्हणे देवा कळली तुझी माव । माझा मी उपाव करीन आतां॥२१९॥

२२०

कोठें मी रे तुझा धरूं गेलों संग । लावियेलें जग माझे पाठी
सर सर परता अगुणा गोपाळा । नको लावूं चाळा खोटा येथें
रूपाच्या लावण्यें नेली चित्त-वृत्ति । न देखें भोंवतीं मी हीं माझीं
**नामा** म्हणे तुम्ही जीवीं चि बैसलां । बोलाचिया बोला दावूनियां ॥

२२१

तुझा माझा देवा कांरे वैराकार । दु:खाचे डोंगर दाखविसी
बळें बांधोनियां देसी काळा-हातीं । ऐसें काय चित्तीं आलें तुझ्या
आम्हीं देवा तुझी केली होती आशा । बरवें हृषीकेशा कळों आलें
**नामा** म्हणे देवा करा माझी कींव । नाहीं तरी जीव घ्यावा माझा ॥

२२२

वारंवार काय विनवावें आतां । समजावें चित्ता आपुलिया
तूं काय म्हणसी कंटाळेल हा चि । जाईल उगा चि उठोनियां
मजलागीं देवा जासी चुकवोनि । आणीन धरूनि तुजलागीं
दृढभक्तिभाव प्रेमाचा हा दोर । बांधीन सत्वर तुझे पायीं
**नामा** म्हणे बोल काय विठो आतां । भेटावें सर्वथा यांत बरें ॥

२२३

आतां होणार तें हो कां पंढरीनाथा । न सोडी सर्वथा पाय तुझे
हृदयीं तुझें ध्यान मुखीं जपें नाम । हा चि नित्यनेम सर्व माझा
आम्हीं तुझी देवा धरियेली कांस । न करीं उदास पांडुरंगा
**नामा** म्हणे देवा भक्तजन-वत्सला । क्षण जीवावेगळा न करीं मज॥

२२४

कागदींचें वित्त वेश्येसीं दिधलें । तैसें आम्हां केलें नारायणें
जोडोनियां हस्त बोले मढ्यापासीं । तैसें तूं मजसीं केलें देवा
कडू भोपळ्याचा कोणता उपयोग । तैसें पांडुरंगें केलें जाण
**नामा** म्हणे ऐसें करूं नको देवा । समागम व्हावा पायांसवें ॥

२२५

आम्हीं शरणागतीं सांडिली वासना । ते त्वां नारायणा अंगिकारिली
म्हणोनि प्रसन्न व्हावया आमुतें । वोरसल्या चित्तें चालविसी
अज्ञान बाळकु ठकविला धुरु । तैसा मी अधीरु नव्हे जाण
लंकापति केला तुवां बिभीषण । झालासी उत्तीर्ण वाचाऋणें
उपमन्यें घेतला दुधाचा चि छंद । तैसा बुद्धिमंद नव्हे जाण
**नामा** म्हणे तैसा नव्हे मी अज्ञान । माग देईन तूज शरीर अवघें ॥

२२६

तुझ्या चरणाचें तुटना अनुसंधान । जाईल माझा प्राण तत्क्षणीं
मग हें ब्रह्मज्ञान कोणातें सांगसी । विचारीं मानसीं पांडुरंगा
वदनीं तुझें नाम होतां चि खंडणा । शतखंड रसना होईल माझी
सांवळें सुंदर रूप तुझें दृष्टि । न देखतां उन्मूळती नयन हे
**नामा** म्हणे केशवा अनाथांचा नाथ । झणीं माझा अंत पाहसी देवा ॥

## ( ३१ )

मायबापांपरिस लोभ तुझा हरी । आहे मजवरी केशिराजा
आतां जाणसी तें कृपाळुवा करीं । लाज सर्व हरी आहे तुज
माझें जातिकुळ नाहीं त्वां पाहिलें । अन्याय साहिले कोटयानकोटी
जन्मोजन्मीं मज घातिलें पाठीसी । संकटीं रक्षिसी नारायणा
देऊनि प्रेमभातें पाळिलें पैं मातें । साउली तळहातें केली देवा
**नामा** म्हणे काई होऊं उतराई । पुढें जन्म नाहीं ऐसें केलें ॥२२७॥

२२८

धांवूनि जाईन श्रीमुख पाहीन । इडापीडा घेईन विठोबाची
तया सुखा दृष्टि लागेल वो झणीं । मग मी साजणी काय करूं
म्हणोनि माझें चित्त व्यापिलें उद्वेगें । शिणलों मी उबगें जन्मोजन्मीं
धरोनियां घालीं जीवाचे अंतरीं । आंतोनि बाहेरी जाऊं नेदी
वासना पापिणी करील पाय-रव । मग हा अनुभव कोठें पाहूं
वृत्तीसहित करीन मनाचें सांडणें । न विसंबें प्राणें म्हणे नामा ॥

२२९

गाणीं मी गाइलों भाटीं वाखाणिलों । जन्मोनियां झालों दास तुझा
आतां माझी लाज राखें नारायणा । झालों केंविलवाणा देशोदेशीं
मायें दुऱ्हाविलों मोहें मोकलिलों । सोय पैं चुकलों संसाराची
विषयां विटलों गोत्रजां तुटलों । जन्मोनि पैं आलों तुझे पायीं
षड्वर्गी सांडिलों प्रवृत्ती दंडिलों । मीपणा मुकलों मायबापा
**नामा** म्हणे तुझ्या चरणाची आवडी । लागली न सोडी चित्त माझें ॥

२३०

वाजविली डांक चौक ठेवियला । ठायीं पंढरीचे विठ्ठले तुज हांकार केला
रंगा येईं वो खेचरे विठाई सुंदरी । तुझीं पाउलें गोजिरीं कैं मी दृष्टीं देखेन
पाजळला दीप फिटला अंधकारु । न लावा उशीरु पांडुरंगे माउलिये
तमोगुणाचा रज जाळुनी धूप केला ।उशीर कां लाविला पांडुरंगे माउलिये
तनमनाची मूद टाकीन तुजवरोनि । वैकुंठवासिनी पांडुरंगे माउलिये
अहंकारदैवतें झडपिलें **नामयासी** । येउनियां रंगासी रंग राखीं आपुले ॥

२३१

अठ्ठावीस युगें उभा विटेवरी । मुद्रा अगोचरी लावूनियां
ध्यान-विसर्जन केधवां करिसी । नेणवे कोणासी ब्रह्मादिकां
पाहतां तुजकडे माझें मीपण उडे । भेदाचें सांगडें हारपलें
तुजपाशीं असतां मुकिजे जीवित्वा । ठकले तत्त्वतां नेणों किती
**नामा** म्हणे स्वामी कृपा-दृष्टी पाहें । मन पायीं राहे ऐसें करी ॥

२३२

तरी गाण नव्हे मी गाणीव करीं । जेणें तुमतें हरी संतोष उपजे
तरी जाण नव्हे मी जाणीव करीं । जेणें तुमतें हरी संतोष उपजे
तरी योगी नव्हे मी ध्यान धरीं । जेणें तुमतें हरी संतोष उपजे
यावरी जाणसी तें करीं अनंता । विष्णुदास संतां विनवीतसें ॥

२३३

कासवीचीं पिलीं राहती निराळीं । दृष्टि पान्हावली सुधामय
तैसा जवळूनि असेन मी दूरी । दृष्टि मजवरी असों द्यावी
तान्हें वत्स घरीं वनीं धेनु चरे । परी ती हुंबरे क्षणोक्षण
**नामा** म्हणे सत्ता करिसी निकट । भक्तांसी वैकुंठ-पद देसी ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत.
अनुक्रम ........... वि: .............
क्रमांक ............ नों: दि: ..........

## ७ संकल्प आणि मागणें

### ( ३२ )

माता पिता बंधु भगिनी इष्ट मित्र विठ्ठला तूं गा
बापा यावें भेटावें विसांवा माझा तूं गा।
माझा कुळाचार माहेर जिव्हार विठ्ठला तूं गा
माझें विद्या धन आयुष्य आरोग्यता विठ्ठला तूं गा।
माझें तप व्रत तीर्थ दान पुण्य विठ्ठला तूं गा
माझा गुरुमंत्र दैवत आगम निगम विठ्ठला तूं गा।
माझा आचार विचार सत्यवाद धीर धर्म विठ्ठला तूं गा
माझें यश कीर्ति निवृत्ति माझी तृप्ति विठ्ठला तूं गा।
माझे यम नियम प्राणायाम प्रत्याहार विठ्ठला तूं गा
**नामा** म्हणे विठ्ठला केशव परमात्मा माझा तूं गा॥२३४॥

२३५

जन्मोजन्मीं आम्हीं बहु पुण्य केलें। तेव्हां या विठ्ठलें कृपा केली
जन्मोनि संसारीं झालों त्याचा दास। माझा तो विश्वास पांडुरंगीं
अनेक दैवतां नेघे माझें चित्त। गोड गातां गीत विठोबाचें
भ्रमर सुवासीं मधावरी माशी। तैसें या देवासी माझें मन
**नामा** म्हणे मज पंढरीस न्या रे। हृडसोनि द्या रे विठोबासी॥

२३६

विठ्ठल आमुचें सुखाचें जीवन। विठ्ठल-स्मरण प्रेम-पान्हा
विठ्ठल चि ध्यावों विठ्ठल चि गावों। विठ्ठल चि पाहों सर्वांभूतीं

विठ्ठलापरतें न दिसे सर्वथा । कल्प येतां जातां गर्भवास
**नामा** म्हणे चित्तीं आहे सुखरूप । संकल्प विकल्प मावळती ॥

२३७

आम्ही विठोबाचे दूत । यमा आणूं शरणागत
मुखीं नाम हातीं टाळी । महापापा करूं होळी
एवढा प्रताप नामाचा । रीघ नव्हे कळिकाळाचा
ऐसा **नामा** यशवंत । विठोबाचा शरणागत ॥

२३८

आणिक न मागे हें ब्रीद साजे चातका । भूमीच्या उदका न खालवी माथा
आणिकापुढें न गाये हें ब्रीद साजे कोकिळियें । वसंतऋतु स्वयें ओळखीतसे
आणिकापुढें न नाचे हें ब्रीद साजे मयूरा । वर्षला घन सारा वळोनियां
आणिकांचा पांगिला न करीं गा देवा । **नामा** म्हणे केशवा रंक तुझा ॥

२३९

देवा माझें मन आणि तुझे चरण । एकत्र करून दिधली गांठी
होणार तें हो गा सुखें पंढरीनाथा । कामया शिणतां वायांविण
माझिये अदृष्टीं ऐसें चि पैं आहे । सेवावे तुझे पाय जन्मोजन्मीं
असतां निरंतर येणें अनुसंधानें । प्रारब्ध भोगणें गोड वाटे
हृदयीं तुझें रूप वदनीं तुझें नाम । बुद्धि हे निष्काम धरिली देवा
**नामा** म्हणे तुझीं पाउलें चिंतितां । झालो कृतकृत्यता जन्मोजन्मीं ॥

२४०

श्रीहरि श्रीहरि ऐसें वाचें म्हणेन । वाचा धरिसी तरी मी श्रवणीं ऐकेन
श्रवणीं दाटसी तरी मी नयनीं पाहीन । ध्यानीं मी ध्याईन जेथेंतेथें
जेथें जायें तेथें लागला हा आम्हां । न संडीं वर्म म्हणतसे **नामा** ॥

२४१

माझा भाव तुझे चरणीं । तुझे रूप माझें नयनीं
सांपडलों एकमेकां । जन्में नव्हे रे सुटिका
त्वां तोडिली माझी माया । मी जडलों तुझ्या पायां
त्वां मज केलें रे विदेही । म्यां तुज धरिलें हृदयीं
**नामा** म्हणे गा सुजाणा । सांगा ठकिलें कोणें कोणा ॥

२४२

माझें मन पाहें कसून । चित्त न ढळे तुजपासून
मजवरी घालीं घण । परी मी न सोडीं चरण
मान कापून देईन शिर । पाहें कृपण कीं उदार
**नामा** म्हणे खेचर माय । आम्हां तारक तुझे पाय ॥

२४३

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो
चरण न सोडीं सर्वथा । आण तुझी पंढरीनाथा
वदनीं तुझें मंगल नाम । हृदयीं अखंडित प्रेम
**नामा** म्हणे केशिराजा । केला नेम चालवी माझा ॥

## ( ३३ )

अवघा संसार करीन सुखाचा । जरी झाला दुःखाचा दुर्धरु हा
विठोबाचें नाम गाईन मनोभावें । चित्त तेणें नांवें सुखावेल
संतसमागमें नाचेन रंगणीं । तेणें होईल धूणी त्रिविध तापा
**नामा** म्हणे सर्व सुखाचा सोइरा । न विसंबें दातारा क्षणभरी ॥ २४४ ॥

२४५

नाद भ्रमे जैसे मिरगाए । प्राण तजे वाको धिआनु न जाए
ऐसे रामा ऐसे हेरउँ । राम छोडि चितु अनत न फेरउँ
जिउँ मीना हेरै पसुआरा । सोना गढते हिरै सोनारा
जहँ जहँ देखउँ तहँ तहँ रामा । हरिके चरण नित धिआवै **नामा** ॥

२४६

जैसी भूखे प्रीति अनाज । तृखावंत जल-सेती काज
जैसी मूढ कुटंब-पराइण । ऐसी नामे प्रीति नराइण
नामे प्रीति नराइण लागी । सहज सुभाइ भइओ बैरागी
जैसी प्रीति बारिक अरु मामा । ऐसा हरि-सेती मनु राता
प्रणवै **नामदेउ** लागी प्रीति । गोबिदु बसै हमारै चीति ॥

२४७

मैं बउरी मेरा रामु भतारु । रचि रचि ताकउ करउँ सिगारु
भले निंदउ भले निंदउ भले निंदउ लोगु । तनु मनु राम पिआरे जोगु
बादु बिबादु काहुसिउ न कीजै । रसना राम-रसाइनु पीजै
अब जीअ जानि ऐसी बनि आई । मिलउँ गुपाल नीसानु बजाई
उसतति निंदा करै नरु कोई । **नामे** श्रीरंग भेटल सोई ॥

२४८

येतियां पुसें जातियां धाडीं निरोप । पंढरपुरीं आहे माझा मायबाप
येईं विठाबाई आई माउलिये । निढळावरी कर ठेउनी पालवीं ये
पिवळा पितांबर गगनीं झळकला । गरुडावरी बैसोनि माझा कैवारी आला
डोळयांतील बाहुली माझी विठाई झाली। घनानंदमूर्ति माझ्या ध्यानासी आली
विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिवाळी । विष्णुदास **नामा** जीवेंभावें ओवाळी॥

२४९

विठोबाच्या गांवा जाईन धांवोनि । घालीन लोळणी चरणांवरी
शीणभाग माझा हिरोनि नेईल । जीवींचे पुसेल जडभारी
हरुषें लोळत जाईन महाद्वारा । भेटाया सामोरा येईल मज
उचलोनि सीस पुसील आदरें । मुख पितांबरें पुसील माझें
धरोनि हनुवटी उठवील हस्तकीं । ठेवील मस्तकीं अभय-कर
राही रखुमाई माता सत्यभामा । कडे घेउनी **नामा** स्तनीं लावी॥

( ३४ )

पाहूं द्या रे मज विठोबाचें मुख । लागलीसे भूक डोळां माझ्या
कस्तुरी कुंकुम भरोनियां ताटीं । आंगीं बरवी उटी गोपाळाच्या
जाई जुई पुष्पें गुंफोनियां माळा । घालूं घननीळा आवडीनें
**नामा** म्हणे विठो पंढरीचा राणा। डोळियां पारणा होत असे ॥२५०॥

२५१

घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळां मी पाहीन रूप तुझें
प्रेमें आलिंगीन आनंदें पूजीन । भावें ओंवाळीन म्हणे **नामा** ॥

२५२

श्रीमुखाची सोय पाहों म्हणें जरी । एवढा अधिकारी कैंचा देवा
चरणांजवळूनि नसावें जी दूरी । जन्मजन्मांतरीं हें चि देईं
तुज देतां सोपें मज तृप्ति अल्पें । सर्वज्ञा साक्षेपें सांगतसें
अनाथाचा नाथ हें तो ब्रीद साच । न करावें उदास **नामा** म्हणे ॥

२५३

माझें मागणें तें किती । दाता लक्ष्मीचा पति
मेघ वर्षे शिळाधारीं । तेथें चातकचंचू भारी

महाडोहो **गंगाजळ** । तृप्त एखादा अंजुळ
साखरेची सांठी । तेथें मंगीची मुखवटी
**नामा** म्हणे मी सेवेसी । तूं तो उदाराचा राशि ।।

२५४

जाणीव शाहणीव वाहियेलें ओझें । तेणें चरण तुझे अंतरले
आतां नेणतें चि करीं मज हरि । लौकिकाबाहेरीं घालीं मज
तुझिया नामाचें लागों दे गा पिसें । देहीं देह न दिसे ऐसें करीं
**नामा** म्हणे तुज एकातें मी जाणें । रहित करणें कल्पनेसी ।।

२५५

हें चि देवा पैं मागत । चरण सेवा अखंडित
वास द्यावा पंढरीचा । सदा संग हरिदासांचा
जन्म हो कां भलते याती । परी मी न चुके तुझी भक्ति
**नामा** म्हणे कमळापती । हें चि द्यावें पुढतीं पुढतीं ।।

२५६

सगुण निर्गुण श्रुति ज्या बोलती । तो तूं माझे चित्तीं पंढरीराया
आहेसी तितुकें तूं चि सर्वगत । मी काय अनाथ वर्णूं तुज
चरणींची आवडी न संडावी मनें । यापरी पोषणें मायबापा
साक्ष भीमरथी संत पुंडलीक । **नाम्यातें** आणिक न लगे कांहीं ।।

२५७

मनुष्य करिसी तरी भक्तीचेनि मिषें । तुझे द्वारीं वसे ऐसें करीं
स्वान करिसी तरी उच्छिष्ठाचेनि मिषें । तुझे द्वारीं वसे ऐसें करीं
पक्षी करिसी तरी चारियाचेनि मिषें । तुझे द्वारीं वसे ऐसें करीं
झाड करिसी तरी तुळशीचेनि मिषें । तुझे द्वारीं वसे ऐसें करीं

वृक्ष करिसी तरी मंडपमेखाचेनि मिषें । तुझे द्वारीं वसें ऐसें करीं
पाषाण करिसी तरी रंगशिळेचेनि मिषें । तुझे द्वारीं वसें ऐसें करीं
उदक करिसी तरी सडियाचेनि मिषें । तुझे द्वारीं वसे ऐसें करीं
**नामा** म्हणे विठो कीर्तनाचेनि मिषें । तुझें द्वारीं वसे ऐसें करीं ।।

२५८

तुझें नित्य सुख घ्यावें येणें मनें । असावें संधानें चरणाचेनि
ऐशी मज कृपा करीं गा विठ्ठला । म्हणविसी आपुला दास जरी
श्रवणीं तुझें नाम ऐकावें आवडीं । चित्तें देऊनि बुडी प्रेमडोहीं
नयनीं तुझें रूप देखावें सर्वत्र । व्हावें भूतमात्र सखे माझे
वदनीं तुझें नाम गावें निर्विकल्प । धरूनि तुझें रूप हृदयकमळीं
काया संतांपायीं जावी लोटांगणीं । हें भाग्य अनुदिनीं देईं बापा
मानाचा मज ओस अपमानीं उल्हास । देईं तुझा ध्यास सर्वकाळ
**नामा** म्हणे विठोबा तरी च शरणागत । नाहीं तरी पतित म्हणती मज।

२५९

मनें ध्यान करणें वाचें उच्चारणें । नयनीं तुज पाहणें हेंचि देईं
करें पूजा करणें माथा चरणीं ठेवणें । श्रवणीं गुण ऐकणें हें चि देईं
डावीउजवीकडे आणि मागेंपुढें । अंतीं चरण जोडे हें चि देईं
**नामा** म्हणे केशवा तुझी मज गोडी । जन्मोजन्मीं जोडी हें चि देईं।

२६०

आसनीं शयनीं भोजनीं गमनीं । तुझे पाय दोन्ही दावीं मज
संसार-कल्मष समूळ छेदिसी । दावीं अहर्निशीं पाय मज
हरी ध्यानीं मनीं भक्तां तूं परेशा । अनाथा कोंवसा गोवळिया
**नामा** म्हणे नाम ऐकों सर्वोत्तमा । संसारींच्या श्रमा वारीं देवा।

( ३५ )

उडाली पक्षिणी गेली अंतराळीं । चित्त बाळाजवळीं ठेवूनियां
तैसें माझें मन राहो कां ईश्वरीं । मग सुखें संसारीं असेन कां
धेनु चरे वनीं वत्स असे घरीं । चित्त वत्सावरी ठेवूनि फिरे
विष्णुदास **नामा** विनवी परोपरी । हें प्रेम श्रीहरी द्यावें मज।।२६१।।

२६२

असोनि न दिसे लौकिक वेव्हारीं । ऐसें निरंतरी लपवीं मातें
तुझे स्वरूपीं माझें असो अनुसंधान । वरी प्रेमजीवन देईं देवा
मनाचिये वृत्ती अंतरापासूनि । झोंबों न दीं दोन्ही कामक्रोध
**नामा** म्हणे ऐसें पाळशील मातें । तरी मी तूंतें न विसंबें ।।

२६३

कृपणाचें धन असे भूमीआंत । जेथें जाय चित्त तेथें धन
ऐसी मज देवा लावावी हे सवे । हें चि मज द्यावें पांडूरंगा
जेथें जेथें मन जाईल हें माझें । तेथें तेथें तुझें रूप भासो
**नामा** म्हणे सर्वांपरी मी अज्ञान । विनवीं आस करून पांडुरंगा ।।

२६४

मी असें तेथें मग तूं कैंचा । उपजत ठायींचा तोडीं वेलु
आपुलें करूनि ठेवीं तुझे चरणीं । न मानिती कोणी क्षिती नाहीं
सेवा तुझी देईं नको दुजेपण । येर तो अभिमान खंडीं माझा
देवा आवडसी माझिया जीवा । सुखरूप केशवा विठ्ठलराजा ।।

२६५

विठोबाचे पाय जन्मोनि जोडावे । संबंध तोडावे कामक्रोध
ऐक्यसुख घ्यावें एकविध भावें । प्रेम न संडावें आवडीचें
वृत्तीसहित मन पायीं चि ठेवावें । अद्वैत भोगावें प्रेमसुख
देहीं देहभाव प्रकृती दंडावें । सांडणें सांडावें ओंवाळूनि
**नामा** म्हणे ऐसा हेतु माझ्या जीवें । विठो पुरवावें आर्त माझें ।।

२६६

माझें व्रत एक चालवीं विठ्ठला । तुज घटीं सकळां देखें ऐसें
तेव्हां माझें चित्त पावे समाधान । नाहीं तरी जिणें काय व्यर्थ
मागितलें फार तुज काय देवा । नको बा केशवा मीतूंपण
**नामा** म्हणे माझा कैवारी सबळ । असोनियां काळ भोगूं काशा।।

( ३६ )

तुझे चरण देखोनि हरली भवव्यथा। पुढतीं एक चिंता वाटे थोर
झणीं मज मुक्ति देसी पांडुरंगा । मग मी तव संगा केंवी मिळे
तुझ्या कथा मज अमृत संजीवनी । कवणाच्या श्रवणीं ऐकों जावों
म्हणोनि माझ्या जीवा वाटे जड भारी । उदास मुरारी करिसी झणीं
**नामा** म्हणे मज तुझी चरणसेवा। जन्मोजन्मीं देवा द्यावी मज।।२६७

२६८

ऐकें मोक्षाची मी कथा । तेणें भय वाटे चित्ता
देवा कांहीं न मागें न मागें । मौन असें संत-संगें
ऐकें समाधीची गोडी । मन तुझे पायां ओढी
**नामा** म्हणे अभयदान । देऊनि सांगें प्रेम खूण ।

२६९

वैकुंठासी आम्हां नको धाडू हरी । वास दे पंढरी सर्वकाळ
वैकुंठ कोपट जुनाट झोंपडी । नको आडाआडीं घालूं आम्हां
वैकुंठीं जाऊनि काय बा करावें । उगेंचि बैसावें मौनरूप
**नामा** म्हणे मज येथें चि हो ठेवीं । सदा वास देईं चरणांजवळी ।।

२७०

कृपा करूनि त्वां मज प्रसन्न व्हावें । आणि म्यां मागावें बुद्धि-ज्ञान
ऐसी भुली मज न घालीं पांडुरंगा । विघड सत्संगा न करीं मज
**नामा** म्हणे तुझ्या प्रेमालागीं भक्ति । घेतली म्यां सूति जन्म-मरण।।

२७१

भुक्ति मुक्ति मागों तुज । माझे हंसती पूर्वज
मज प्रेम पढिये देवा । न मागें आन कांहीं केशवा
होऊं सिद्धीचा साधिता । दैवें सांडिलें सर्वथा
**नामा** म्हणे तूं जाणसी । माझा भाव हृषीकेशी ।।

...ठाणे.
अनुक्रम ........ दि: ........
...क ........ नों: दि: ........

## ८ दर्शनानुभव

### (३७)

कोटि दिवाळचा दसरे । आम्हां हें चि झालें पुरें
घरोघरीं ओंवाळणी । विठ्ठल देखिला नयनीं
झाला सुखाचा शेजार । करा नामाचा गजर
**नामयाचा** स्वामी आला । ब्रह्मादिकां आनंद झाला ॥२७२॥

२७३

कोटि-सूर्य प्रभा-दीप्ति । गगनीं झळकली अवचितीं
संत नामया सांगती । पैल आला कमळापति
वत्सालागीं जैसी धेनु । तैसी धांवे जगज्जीवनु
गरुडाचे धुंदुवातीं । दाही दिशा आक्रंदती
हरिकंठींची सुमनमाळा । सुटोनि आली भूमंडळा
उचलोनि दोन्ही बाहीं । **नामा** धरिला हृदयीं ॥

२७४

त्वरें धावोनियां आलासे गोविंद । सावध सावध नामदेवा
रुसलासे नामा देवासीं न बोले । करें कुरवाळिलें वदन तेव्हां
समजावूनि देवें धरिला पोटासीं । बोले मजपाशीं नामदेवा
**नामा** म्हणे देवा उशीर कां केला । किंवा माझा आला तुज राग ॥

२७५

नामयाचें प्रेम केशव चि जाणे । केशवासी राहणें नाम्यापाशीं
केशव तो नामा नामा तो केशव । प्रेम भक्तिभाव मागतसे
विष्णुदास **नामा** उभा केशवद्वारीं । प्रेमाची शिदोरी मागतसे ॥

२७६

घे रे घे रे नाम्या दिलें माझें प्रेम । घोकीं माझें नाम सर्वकाळ
शिरावरी हात ठेवीतसे माझ्या । अभिमान तुझा गेला म्हणुनी
भक्तिसुख देवें दिलें नामयातें । नामा परमामृतें तृप्त झाला
**नामा** म्हणे देवा झालों मी पावन । माझें तुजविण कोण आहे ॥

२७७

बाहेरीं भीतरीं तुज चि मी देखें । चित्त तेणें सुखें वेडावलें
संतसंगें मज पालट हा झाला । पाहतां विठ्ठला रूप तुझें
मीपणासहित आनंदीं बुडालें । न निघे कांहीं केलें चित्त माझें
**नामा** म्हणे एक उरलीसे वासना । स्वामी-सेवकपणा देईं देवा ॥

२७८

क्षणीं दृष्टि लागो तुझ्या सगुणपणा । जेणें माझ्या मना बोध केला
अनंता जन्मींचें विसरलों दुःख । पाहतां तुझें मुख पांडुरंगा
योगियांच्या ध्यानीं ध्यातां नातुडसी । तो तूं आम्हांपाशीं मागेंपुढें
**नामा** म्हणे जीवें करीं निंबलोण । विटेसहित चरण वोंवाळीन ॥

२७९

तुझ्या चरणीं माझ्या मनें दिली बुडी । इंद्रियें बापुडीं वेडावलीं
आतां विषयसुख जाणावें कवणें । जाणोनि भोगणें कवणें स्वामी
देह सहजस्थिती राहिला निष्काम । हृदयीं सदा प्रेम वोसंडत
**नामा** म्हणे केशवा भक्तजनवत्सला । क्षण जीवावेगळा न करीं तुज ॥

( ३८ )

व्यापकापरीस मन म्यां केलें वाड । सांपडलें गोड प्रेमसुख
जिकडे पाहे तिकडे विठोबा अवघा । भीमा चंद्रभागा पुंडलीक
बाहेरीं भीतरीं सर्व निरंतरीं । ब्रह्मांड पंढरी झाली मज
महुरले तरुवर फळीं पुष्पीं भार । ते निर्विकार सनकादिक
आवडीचा आनंदु तो चि वेणुनादु । अनुभव गोविंदु गोपवेषें
**नामा** म्हणे विठो भक्तीचा वालभा । मागेंपुढें उभा सांभाळित ॥२८०॥

२८१

ध्यानीं ध्यातां मनीं हा चि येउनी बैसे । गीतीं गातां वसे हृदयकमळीं
बाहेरीं भीतरीं वेधिलें वो येणें । रुक्मिणीरमणें पांडुरंगें
भाग्यजात जीवा कांहीं चि नावडे । वांचोनि पवाडे गोपाळाचे
निद्रा आणि जागृतीं स्वप्नीं आणि सुषुप्तीं । देखें कृष्णमूर्ति सर्वगत
ऐसा अखंड विदेही लौकिकाविरहित । **नामा** जीवन्मुक्त होउनी ठेला

२८२

सांवळीं श्रीमूर्ति हृदयीं बिंबली । तरी पालटली देहबुद्धि
धन्य माझा जन्म धन्य माझा भाव । ध्यानीं केशिराव नांदतसे
आशा तृष्णा कैशा मावळल्या देहीं । बुडोनियां पायीं ठेलें चित्त
**नामा** म्हणे ऐशी विश्रांति पै झाली । हृदयीं न्याहाळीं केशिराज ।।

२८३

प्रेमफांसा घालोनियां गळां । जीत धरिलें गोपाळा
एक्या मंत्राची करूनि जोडी । विठ्ठलपायीं घातली बेडी
हृदय करूनि बंदीखाना । विठ्ठल कोंडूनि ठेविला जाणा

सोहं-शब्दें मार केला । विठ्ठल काकुळती आला
**नामा** म्हणे विठ्ठलासी । जीवें न सोडीं सायासीं ।।

२८४

मन माझें उन्मन वासना तल्लीन । देखिले हरिचरण सर्वांठायीं
गुरुशिष्यमत हारपला दृष्टांत । प्रत्यक्ष त्वरित हरि झाला
**नामा** म्हणे देहीं तंव उभा चहूं बाहीं । दिशा द्रुमित दाही हरि दिसे ।।

२८५

एक वेळ नयनीं पहावा । मग जाइजे भलत्या गांवा
आठवाल वेळोवेळां । विठोबा आहे रे जवळां
हृदयीं मांडूनियां ठसा । **नामा** म्हणे केशव असा ।।

२८६

गूळ गोड न लगे म्हणावा । तैसा देव न लगे वानावा
सेवी तो चि चवी जाणे । येरां सांगतां लाजिरवाणें
**नामा** म्हणे या खुणां । तुम्ही ओळखा पंढरीराणा ।।

२८७

धेनु विये वनीं तिसी कैंची सुइणी । तरी तें वत्स स्तनीं लावी कवण
सहज लक्षण जयाचिये ठायीं । तो आपुलिये सोई धांवतसे
उपजतां चि फूल मोगऱ्याच्या माथां । त्यासी परिमलता कोणें लाविली
**नामा** म्हणे तैसें आहे गा श्रीहरी । सोइचे व्यापारीं घेईन तूतें ।।

( ३९ )

ओवाळूं गेली मी वो द्वारके । जिकडे पाहे तिकडे चतुर्भुज सारिखें
लाजिली गे माये आतां कोणा ओवाळूं । जिकडे पाहें तिकडे चतुर्भुज गोपाळू

लाजोनियां आली सखियांमाझारीं । जिकडे पाहें तिकडे चतुर्भुज नरनारी
श्रीवत्सलांछन हें चि ओळखण । विष्णुदास नामयानें सांगितली खूण।२८८।

२८९

रूपें शामसुंदर नीलोत्पल-गाभा । सखिये स्वप्नीं शोभा देखियेला
शंख चक्र गदा शोभती चहूं करीं । सखिये गरुडावरी देखियेला
शयन शेषपृष्ठीं नाभी परमेष्ठी । गंगा वामांगुष्ठीं देखियेला
पीतांबर कटी दिव्यचंदन-उटी । सखिये जगजेठी देखियेला
विचारितां मानसीं न ये जो व्यक्तीसी । नामा केशवेंसीं लुब्धोनि ठेला ॥

२९०

देहमंदिराभीतरीं । शेजे सूतले श्रीहरि
निद्रा-उन्मनीचे भरीं । तें म्यां स्वप्न देखिलें
ध्यानीं पहुडला सांवळा । जवळीं नारी बारा सोळा
विंजणें वारिती सकळा । सोहं-शब्द जागरणीं
धिं धिं तुरे वाजती । अनुहात-ध्वनि गर्जती
तेथें निद्रा ना सुषुप्ति । चंद्र सूर्य मावळले
मना पवना नाहीं भेद । तया ठायीं हा गोविंद
तेथें खुंटला अनुवाद । वेद-श्रुति आटल्या
म्हणे विष्णुदास नामा । जन्ममरण नाहीं आम्हां
कृपा केली मेघश्यामा । संतसंगे तारिलों ॥

२९१

चेइला तो जाण रे सद्‌गुरुवचनीं निर्धारें
विपरीत मानवा विसर पडला कंठीं जया परिहार रे ।

आपणा पैं पहावया कवण लावूं दिवा रे
चंद्रसूर्य जेणें प्रकाशे तो मी कैसा पाहूं रे ।
अंत त्यासी नाहीं रे स्थान मान कांहीं रे
चेइला तेणें ओळखिला येरांसी अगम्य भाई रे ।
पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर नाहीं दाही दिशा रे
प्रळयीं सागर एक होती अनुभविया तो तैसा रे ।
काष्ठीं पावक उपजला तो हि तया सम रे
नामा म्हणे केशिराजा चेइल्या आम्हां तुम्ही रे ।।

२९२

आतां मज भय नाहीं पैं कोणाचें । जन्ममरणाचें दुःख गेलें
बंध-मोक्षांची फिटली काजळी । समाधि लागली समाधीसी
नामा म्हणे माझें सर्व हि साधन । खेचर-चरण न विसंबें ।।

२९३

बोलूं ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल डोले
प्रेम सर्वांगाचे ठायीं । वाचे विठ्ठल रखुमाई
नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं
परेहून परतें घर । तेथें राहूं निरंतर
सर्व सत्ता आली हातां । नामयाचा खेचर दाता ।।

( ४० )

आइ न होती बापु न होता करमु न होती काइआ
हम नहीं होते तुम नहीं होते कवनु कहांते आइआ ।

राम कोइ न किसहीकेरा जैसे तरवर पंखि-बसेरा
चंदु न होता सूरु न होता पानी पवनु मिलाइआ
सासतु न होता बेदु न होता करमु कहांते आइआ ।
खेचर भूचर तुलसीमाला गुरु-परसादी पाइआ
**नामा** प्रणवै परम ततु है सतिगुर होइ लखाइआ ॥ २९४ ॥

२९५

एक अनेक विआपक पूरक जत देखउँ तत सोई
माइआ चित्र बचित्र बिमोहित बिरला बूझै कोई ।
सभु गोबिंदु है सभु गोबिंदु है
गोबिंदु बिनु नहीं कोई ॥ ध्रु० ॥
सूतु एकु मणि सत-सहस जैसे ओतिपोति प्रभु सोई
जलतरंग अरु फेन बुदबुदा जलते भिन्न न होई ।
मिथिआ भरमु अरु सुपन मनोरथ सति पदारथ जानिआ
सुकृत मनसा गुर उपदेसी जागत ही मनु मानिआ ।
कहत **नामदेउ** हरिकी रचना देखहु हृदै बिचारी
घट घट अंतरि सरब निरंतरि केवल एक मुरारी ॥

२९६

आनीले कुंभ भराईले ऊदक ठाकुरकउ इसनानु करउँ
बइआलीस लख जी जलमहि होते बीठलु भैला काइ करउँ ।
जत जाउँ तत बीठलु भैला । महा अनंद करे सद केला ॥ ध्रु० ॥
आनीले फूल परोइले माला ठाकुरकी हउँ पूज करउँ
पहिले बासु लई है भवरह बीठल भैला काइ करउँ ।

आनीले दूधु रीधाईले खीर ठाकुरकउ नैवेदु करउँ
पहिले दूधु बिटारिओ बछरै बीठलु भैला काइ करउँ ॥
ईभै बीठलु ऊभै बीठलु बीठल बिन संसारु नहीं
थान थनंतरि **नामा** प्रणवै पूर रिहिओ तू सरब मही ॥

२९७

अणमडिआ मंदलु बाजै । बिनु सावण घनहरु गाजै
बादल बिनु बरखा होई । जउ तत्तु बिचारे कोई
मोकउ मिलिओ रामु सनेही । जिह मिलिऐ देह सुदेही
मिलि पारस कंचनु होइआ । मुखु मनसा रतनु परोइआ
निज भाउ भइआ भ्रमु भागा । गुर पूछे मनु पतीआगा
जल भीतरि कुंभ समानिआ । सभ रामु एकु करि जानिआ
गुर चेले है मनु मानिआ । जन **नामै** तत्तु पछानिआ ॥

२९८

जौ राजु देहि त कवन बडाई। जौ भीख मंगावहि त किआ घटि जाई
तू हरि भजु मन मेरे पदु निरबानु। बहुरि न होइ तेरा आवन जानु
सभ तै उपाई भरम भुलाई । जिस तू देवहि तिसहि बुझाई
सतिगुर मिलै त सहसा जाई । किसु हउ पूजउँ दूजा नदरि न आई
एकै पाथर कीजै भाउ । दूजै पाथर धरीए पाउ
जे ओहु देउ त ओहु भी देवा। कहि **नामदेउ** हम हरिकी सेवा॥

२९९

वेद पुरान सासत्र अनंता गीत कबित न गावउगो
अखंड मंडल निरंकार महि अनहद बेनु बजावउगो ।

बैरागी राम हि गावउगो । सबदि अतीत अनाहदि राता
आकुल कै घरि जाउगो
इडा पिंगुला अउरु सुखमना पउनै बंधि रहाउगो
चंदु सूरजु दुइ समकरि राखउँ ब्रह्म जोति मिलि जाउगो ।
तीरथ देखि न जल महि पैसउ जीअ जंत न सतावउगो
अठसठि तीरथ गुरू दिखाए घट ही भीतरि न्हाउगो ।
पंच सहाई जनकी सोभा भलो भलो न कहावउगो
**नामा** कहै चितु हरिसिउ राता सुन्न समाधि समाउगो ॥

३००

सभै घट रामु बोलै रामा बोलै राम बिना को बोलै रे ।
एकल माटी कुंजर चींटी भाजन हैं बहु नान्हा रे ।
स्थावर जंगम कीट पतंगम घटि घटि रामु समाना रे ।
एकल चिंता राखु अनंता अउर तजहु सभ आसा रे ।
प्रणवै **नामा** भए निहकामा को ठाकुर को दासा रे ॥

# भजनांची वर्णानुक्रमणिका

## (अंक भजनाचे आहेत)


अग्नि जाळी तरी न जळती ६२
अग्नीमाजीं पडे बाळू ८४
अठ्ठावीस युगें उभा चंद्रभागे २३
अठ्ठावीस युगें उभा विटेवरी २३१
अणमडिआं मंदलु बाजे २९७
अधरींचें अमृत सेविसी २१६
अनाथ अनाथ म्हणती २१२
अंतकाळीं मी परदेशी १
अपत्याचें हित कीजे २१०
अपराधांची कोडी हे चि २७६
अभ्यासिले वेद झाला २५७
अमृताहुनी गोड नाम २८०
अरे अलगटा माझिया तूं मना २८
अवघा संसार करीन २४४
अवघी चित्तवृत्ति एक २६३
अवघी हे पंढरी सुखाची मांदूस २४५
अवघी हे पंढरी सुखाची वोवरी २४७
अवघे सावधान होऊनि ७
असत्याचे मळ बैसले ४८
असोनि न दिसे लौकिक २६२
आकल्प आयुष्य व्हावें २०७
आगमीं नाम निगमीं नाम ३३
आणिक न मागे हें ब्रीद २३८
आतां आहे नाहीं पाहतां ५
आतां मज भय नाहीं २९२
आतां होणार तें हो कां २२३
आधीं मी लटिका वरी २०२
आनीले कुंभ भराईले २९६
आपुली पदवी सेवकासी १४१
आम्हां कीर्तन कुळवाडी ७२
आम्हां वैष्णवांचा कुळधर्म ७४
आम्हां सांपडलें वर्म १२७
आम्ही परीट चोखट १०४
आम्ही विठोबाचे दूत २३७
आम्हीं शरणागतीं केलासी २१४
आम्हीं शरणागतीं सांडिली २२५
आरुष साबडें नेणें १७५
आसनीं शयनीं भोजनीं २६०
उडाली पक्षिणी गेली २६१
उदाराचा राणा म्हणविसी २१६
उलिसा प्रपंच परी हा २१९
एक अनेक विआपक २९५
एक तत्त्व हरि निर्धार ६०
एक वेळ नयनीं पहावा २८५
एके हातीं टाळ एके हातीं ६९
ऐकें मोक्षाची मी कथा २६८
ऐसा रामराइ अंतरजामी १२४
ओवाळूं गेली मी वो द्वारके २८८

| | | | |
|---|---|---|---|
| कडू वृंदावन साखरें घोळिलें | ८६ | गोक्षीर लाविलें आंधळिया | ३४ |
| कपटाचें कुपथ्य झालें | ४७ | घालीन लोटांगण वंदीन | २५१ |
| करितां वेदाध्ययन ज्योतिष | ६४ | घे रे घे रे नाम्या दिलें | २७६ |
| काखे पान अंगणीं उभे | ३५ | चेइला तो जाण रे | २९१ |
| कागदींचें वित्त वेश्येसीं | २२४ | चोरा ओढोनियां नेइजे | २ |
| काय करूं आतां देवा | २०० | जननिये जिवलगे | १८१ |
| काय करूनि तीर्थाटणें | १७ | जन्ममरणाचें मज भय | २१७ |
| काय गुणदोष माझे | १७९ | जन्मोजन्मीं आम्हीं बहु पुण्य | २३५ |
| काय पांडुरंगा सांग | १९५ | जयवंत असो लक्षुमीचा | १८९ |
| काय वाणूं आतां पायांचा | १२८ | जंव हंस काया | ३ |
| कां रे शिणतोसी घरदार | २१ | जाईजणा देह जाईल नेणसी | ४ |
| कासवीचीं पिलीं राहती | २३३ | जाणीव शाहणीव वाहियेलें | २५४ |
| कां हो माझी सांडी केली | १९८ | जीवन्मुक्त केले नामाचे | १४२ |
| काळ देहासी आला खाऊं | ७५ | जीव विठ्ठल आत्मा विठ्ठल | १२२ |
| काळ वेळ नसे नाम– | ४० | जें जें पुण्य जोडे हरीनामगजरीं | ६७ |
| कृपणाचें धन असे भूमी– | २६३ | जैसा वृक्ष नेणे मान-अपमान | ९६ |
| कृपा करूनि त्वां मज | ७० | जैसी भूख प्रीति अनाज | २४६ |
| कृष्ण-भक्तीविण तरला | १५२ | जौ राजु देहि त कवन | २९८ |
| केधवां भेटसी माझिया | १९२ | ज्याचिया रे मनें देखियजें | ९३ |
| केशव म्हणतां क्लेश | ४३ | झणीं दृष्टि लागो तुझ्या | २७८ |
| कोटि दिवाळ्या दसरे | २७२ | टाळ दिंडी हातीं उभा महाद्वारीं | ७० |
| कोटि-सूर्य-प्रभा दीप्ति | २७३ | तत्त्व पुसावया गेलों | २०१ |
| कोठें मीं रे तुझा धरूं | २२० | तरी गाण नव्हे मी गाणीव | २३२ |
| क्रिया कर्म धर्म तिहीं | ९२ | तान्हेलों भूकेलों | ५२ |
| गणेश नमूं तरी तुझा चि | १०८ | तापत्रय–अग्नीची | १७२ |
| गाणीं मी गाइलों भाटी | २२९ | तीनि छंदे खेलु आछै | १२६ |
| गीता हे चि गंगा | ५० | तुझा माझा देवा कां रे | २२१ |
| गूळ गोड न लगे म्हणावा | २८६ | तुझा विष्णुदास म्हणताती | २०५ |
| गेलिया वृंदावना तेथें | ११५ | तुझीया सत्तेनें वेदांसी बोलणें | ११८ |

तुझे चरण देखोनि २६७
तुझे चरणीं सुख अनुपम आहे १२९
तुझें नित्य सुख घ्यावें २५८
तुझें रूप माझ्या दाखवीं २११
तुझ्या चरणाचें तुटतां १६६
तुझ्या चरणाचें तुटतां २२६
तुझ्या चरणीं माझ्या मनें २७९
तुवां येथें यावें कीं मज १९६
तूं अवकाश मी भूमिका १४४
तूं माझी माउली १८६
तूं माय माउली आस २०८
तूं माय माउली म्हणोनि १८२
त्यागेंविण विरक्ति ८८
त्वरें धांवोनियां आलासे २७४
दुर्लभ नरदेह झाला तुम्हां आम्हां ८
दूधु कटोरे गडवे पानी १६४
देव गुज सांगे पंढरीसी या रे १४९
देव दयानिधि भक्तांचा १३५
देवा आम्हीं तुज दिलें २१३
देवा माझें मन आणि तुझें २३९
देवा माझें मन करुनि २१५
देवा हे विनंती माझी ९
देह जावो अथवा राहो २४३
देह जावो हे चि घडी ५३
देह मंदिराभीतरीं २९०
देहाचा अभिमान न धरावा २०
देहाचें ममत्व नाहीं १८
देशीं परदेशी झालों १९१
धरीं रे मना तूं विश्वास ५७
धरुनि माझी वृत्ति पाहें १३९
धांवूनि जाईन श्रीमुख २२८
धिग धिग तो ग्राम ८७
धेनु विये वनीं तिसी २८७
ध्यानीं ध्यातां मनीं हा चि २८१
न पढावे वेद नको शास्त्रबोध ४२
न लगती कथा व्युत्पत्ति ४१
न लगे तुझी मुक्ति ५५
नव्हे तें चि कैसें झालें रे १००
नाचतां उडतां रडतां पडतां ५९
नाद भ्रमे जैसे मिरगाए २४५
नाम तें चि रूप ३६
नामयाचें प्रेम केशव २७५
नामाचा महिमा नेणें ६२
नामापरता मंत्र नाहीं ३८
नामें सदा शुद्धि प्राणिया ४६
निद्रिस्ताचे सेजे साप का उर्वशी १०६
निंदा आणि स्तुति तुझी चि २०६
निंदील हे जन सुखें निंदू द्यावें ९७
निर्गुणीचें वैभव आलें १२०
निर्विकल्प ब्रह्म कैसेनि आतुडे २३
नेत्र ताऱ्हेले पाज पाणी १८५
पतित-पावन नाम ऐकुनी २१८
पतित-पावन माधव १३२
पत्रावळी काढी वैकुंठनायक १०१
पंढरीचा देव बहुत कोंवळा १३३
पंढरीचें सुख जिहीं १४६
पंढरीस जावें जीवनमुक्त १४८
परदारा परधन परनिंदा १३

परधन परदारा परहरी १२
परब्रह्म विश्वाकारें अवतरलें ११२
परब्रह्मींची गोडी नेणती २४
परियेसी वासने संकल्पस्वरूपे ३१
परिसाचेनि संगें लोह ८३
पक्षिणी प्रभातीं चारियासी १८८
पापाचें संचित देहासी दंडण २७
पाला खाऊनियां घाला १३४
पाहूं द्या रे मज विठोबाचें २५०
पुंडलीकें रचिली पेठ १५०
पुलकधर्म रोमांच नाहीं १५५
पूर्ण कृपा केली देवा ७३
पृथ्वी व्यासी तरी पृथ्वी १५३
पोटीं अहंतेसी ठावो १५
प्रपंच-घडामोडी न सरे ६
प्रेमफांसा घालोनियां गळां २८३
प्रेमामृत-सरितां पवित्र ६६
बदउ की न होउ माधव १२५
वरवेपणें बरवा बाप १११
बहु जन्मांशेवटीं तुजशीं १७७
बाहेरीं भीतरीं तुज चि मी २७७
बोलवरी बोलती १५६
बोलूं ऐसे बोल २९३
ब्रह्म अविनाश आनंदघन १३०
ब्रह्ममूर्ति संत जगीं ८५
ब्राह्मणां न कळें आपुलें ६१
भक्ति-प्रतापें मी पावलों १५८
भवसिंधूचा पार तरावया- ४५
भवसिंधूचा पार तरे तो ९९
भुक्ति मुक्ति मागों तुज २७१
भुजंग विखार पवनाचा आहार १९
भेटीचें आर्त उत्कंठित १९३
मज चालतां आयुष्यपंथें १६५
मन माझें उन्मत वासना २८४
मनु मेरो गजु जिह्वा ५६
मनुष्य करिसी तरी २५७
मनें ध्यान करणें वाचे २५९
मंत्र तंत्र दीक्षा सांगतील ९०
मंत्राचा पैं मंत्र हरि हा ३७
ममता तुटेना मज केशिराजा १७१
माइ न होती बापु न होता २९४
माझा भाव तुझें चरणीं २४१
माझिया रे मनें उपदेश १३१
माझी कोण गति सांगा १९९
माझें मन पाहें कसून २४२
माझें मनीं ऐसें होतसे १७०
माझे मनोरथ पूर्ण कीजे १९४
माझें मागणें तें किती २५३
माझें व्रत एक चालवीं २६६
माता पिता बंधु भगिनी २३४
मायबापांपरिस लोभ तुझा २२७
मी असें तेथें मग तूं २६४
मुक्ताफळ-नथ नाकीं ११३
मुखीं नाम हातीं टाळी १४
मैं बउरी मेरा रामु भतारु २४७
युगें अठ्ठावीस विटेवरी उभा १५१
येईं वो कृपावंते १८७
येईं वो विठ्ठले भक्तजन- १८३

येतियां पुसें जातियां धाडीं २४८
येवढा वेळ कां लाविला १९०
योगियांचें ब्रह्म शून्य ११९
रविरश्मि धरोनि स्वर्गीं ८४
रात्र काळी घागर काळी ११४
रात्रंदिवस खंती वाटे १९७
राम म्हणतां राम चि होसी ५१
रूपें श्यामसुंदर नीलोत्पल २८९
रे जिह्वा करउ सत खंड ५८
लटिका मी गाणू लटिका २०३
लटिकें तरी गायें तुझें २०४
लपालासी तरी नाम कैसें ५४
लोभ लहरि अति नीझर २६८
लौकिकाची कांहीं न धरावी २२
वदनीं तुझें नाम अमृत-संजीवनी १३६
वाजविली डांक चौक २३०
वायां ताडातोडी केली २६७
वारंवार काय विनवावें २२२
वावडी दुरीच्या दुरी २५९
वासनेचा फांसा पडिला २७८
वासनेची करणी आइकें तूं ३०
वासनेविरहित होउनी ७९
वासरूं भोंवे खुंटिया- २७३
विटेवरी उभा दीनांचा कैवारी २०९
विठोबाचे पाय जन्मोनि २६५
विठोबाच्या गांवा जाईन २४९
विठ्ठल आमुचें सुखाचें २३६
विठ्ठल माउली कृपेची सांवली २४०
विठ्ठल विठ्ठल म्हणा ३९
विठ्ठलाचें नाम जे माउलीचे १६०
विषयाचा आंदणा दिसे ०
वीतभर पोट लागलेंसें पाठी ११
वेदपरायण मनीं तो ब्राह्मण ८९
वेद पुरान सासत्र २९९
वेदाध्ययन करिसी ६३
वेदासी कानडा श्रुतीसी कानडा ११०
वैकुंठासी आम्हां नको २६९
वैष्णवांघरीं सर्वकाळ ९४
व्यापका परिस मन २८०
शेतीं बीज नेतां थोडें ६८
श्रीमुखाची सोय पाहों २५२
श्रीहरि श्रीहरि ऐसें वाचे २४०
सगुण निर्गुण श्रुति ज्या २५६
सडचा लावी कांसे कुटुंबिया १३८
संत चरण-रज सेवितां ७८
संतपायीं माया धरितां ७७
संतांचें लक्षण ओळखावया खूण ९१
संतांच्या चरणा द्यावें ८१
सत्य नित्य युक्त शुद्ध १२१
सत्यसंकल्पाचा कर्ता ११७
सदा पैं परिपूर्ण ३२
सद्गुरूसारिखा सोइरा १०३
सभै घट रामु बोलै रामा ३००
समर्थाचें बाळ पांघरे २०९
सर्वांग साजिरीं आहेत ६५
सर्वांभूतीं पाहे एक वासुदेव ९५
सहस्र नामांची घालितां २०७
साराचें हि सार भक्तीचें ४४

| | |
|---|---|
| सांवळी श्रीमूर्ति हृदयीं | २८२ |
| सुखदुःखें दोन्ही आम्हांसी | १०५ |
| सुवर्ण आणि परिमळ | ९८ |
| सोयरा सुखाचा विसांवा | १६१ |
| संसार करितां देव जैं सांपडे | २५ |
| संसार-सागर भरला दुस्तर | २६ |
| संसार-सागरीं पडलों | १६९ |
| संसाराची सोय | १३७ |
| संसारींच्या आह्यां आहाळलों | १७४ |
| स्वामी एक व्हावा तुज | १४३ |
| हडबडलीं पातकें | ४९ |
| हरिकथा-श्रवण श्रवणाचेनि | १५४ |
| हंसत खेलत देहुरे | ७६ |
| हातीं वीणा मुखीं हरि | ७१ |
| हिंदू पूजै देहुरा | १६ |
| हें चि देवा पैं मागत | २२५ |
| होईन संतांचा बोळगणा | ८० |
| क्षण एक मना बैसोनि एकांतीं | २९ |
| ज्ञानराज माझी योग्यांची | १०२ |
| ज्ञानेंविण मोक्ष नाहीं | ८२ |

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 93408
शाखा (स्थळ प्रत)

# नामदेवाचीं भजनें

## -:कठिण शब्दार्थांचा कोश:-

[अंक अभंगाचे आहेत]

अगोचर–शून्यवत्, उन्मनी. २३१
अंगी–बाळ-अंगरखा. १४०
अंडज–पांखरूं, पिलूं. १८६
अनुवाद–बोलणें. २९१
अनुसंधान–संगति. २१५
अप-घात–आत्म-घात. ४
अंभ–पाणी. १८७
अलगट–स्वैर, सैराट. २८
आंकणा–अंकीत, ताबेदार. ३९
आकळणें–घेरणें, धरणें, कळणें. १६५
आगम–शास्त्र. ३३
आटोप–प्रभाव, सामर्थ्य. ३१
आडळ–अडथळा, प्रतिबंध. १८७
आडाआड–आटाआट, खटपट. २६९
आतुडणें–लाभणें, सांपडणें. १८
आंदणा–अधीन, बंदा, मिंधा. १०
आपंगिणें–आपला म्हणून पाळणें. ९
आरुष–साधें, असंस्कृत. १७५
आर्त–आतुरता, उत्कंठा, आवड. १९३
आही–ताप, आंच, ज्वाला. १७४
आहाळणें–भाजणें, करपणें. १७२
आळुकें–हपापलेलें, हावरें. १२०
इडापिडा–असुख, दुःख, दैन्य. २२८
उगलें–मुकाटयानें, स्वस्थपणें. ४७
उत्तर–वचणें, बोलणें. २२
उत्तीर्ण–मुक्त, अनृण, उतराई. २२५
उद्भट–प्रबल. ९९
उलथा–उलथापालथ, विवरण. ४१
एकवट–एकाग्र. ७९
एकट–एकाकी. ९९
एकसरा–एकदम. १०६
ओस–शून्यभाव, खेद. २५८
कडाडीं–जोरानें, उत्साहानें. १०९
कल्पना–विषयाभिलाष. १६७
कळकाळीत–भिववीत. १६५
कांचोळी–एक प्रकारची चोळी. ११४
काजळी–आग. १७२
कानकोंडें–खजील, ओशाळें. २०७
कानडा–अज्ञेय, अगम्य, दुर्बोध. ११०
कामारा–सेवेकरी, चाकर. २१५

काशा–कशासाठीं. २६६
काळ–दुर्भिक्ष, दैन्य. २६६
कुरंगिणी–हरिणी, १३९
कुरवंडी–ओवाळणी, उतरण. १३७
कुवाडें–कूट, कोडें १२०
कुळाचार–कुळांत चालत आलेला आचार. १६६
केउता–कोठें, कसा. १२७
कोडीवरी–कैक, शेंकडों ४८
कोपट–खोपडी. २६९
कोंवसा–कैकारी, आधार. १६६
खसमु–पति. ५६
खंति–हुरहुर. १९७
खिळू–खेळकर, चंचल. ११५
खेंवा–कचाटा, तावड. २१९
गह्वर–हार्द, रहस्य. ३९
गाण–गायक. २३२
गाणीव–गायन. २३२
गाणु–गायक. २०३
गायनी–गाणारी. १०८
गुजरी–गुर्जर स्त्री. १५९
गोंवा–अडकवणी, फसवणूक. १६६
चेइणें–जागें होणें, जाग्रत् होणें. २९१
चाड–इच्छा. २१६
चूडा–केस, सौभाग्य, पति १८९
चाळा–छंद, नाद. २२०
छप्पन्नभाषा–प्राकृत भाषा, मराठी १०२
जडणें–चिकटणें, बिलगणें, घर करून वसणें. २४१
जडभारी–दुःख, कष्ट, संकट. १८२
जल-सेती–पाण्याशीं २४६
(सेती प्राचीन हिंदी तृतीया-पंचमीचा प्रत्यय.)
चाइजणा–अशाश्वत, नश्वर, भंगुर. ४
जान–ज्ञानी. २३२
जाणीव–ज्ञातव्य, पांडित्य. २३२
जात–मात्र (साकल्यार्थक अव्यय) २८१
जिव्हार–हृदय, काळीज, मर्म. २३४
जीवहेतु–जीवनाचा उद्देश, हृदय, अंतरात्मा. ६५
जोडी–लाभ, प्राप्ति. २८३
जोडणें–लाभणें, मिळणें. २५९
जोंजार–ओझें, जंजाळ. १९८
झणें (झणीं)–न, नको. ४
(आज्ञार्थक निषेधक अव्यय.)
झळंबणें–वेढणें, ग्रासणें. १७२
झेंपावणें–उसळणें ६६
ठाकणें–स्वस्थ होणें. ३
ठाणें–स्थिरावणें. १०५
डांक–डंका, नगारा. २३०
डांग–डहाळी, फांदी. १५
डाय–डाव, राज्य (खेळांतील) १००
डिंगर–चाकर, सेवक. ८०
तरी–नाव, नौका, होडी. १३८
तोडर–पादभूषण.
तोडरीं घालणें–जिंकून वश करणें. ९९

त्राहे (त्राहि)–रक्ष, वांचव १८१
त्रिपथा–त्रिपथगा, त्रिभुवन-विहारिणी गंगा १२९
थोकणें–थबकणें, थांबणें. ११२
दंडणें–उभें ठाकणें, शोभणें १३५
दाटणें–बंद करणें, भरून टाकणें २४०
दाटुगें–मजबूत, धडधाकट. ११९
दिठावणें–दृष्ट लागणें. ११९
दीं–देई. २६२
दुडी–घडा, कळशी. १५९
देखणा–पाहणारा. १०८
देहुडा–दीड. ११३
धणी–तृप्ति १३४
धारण–स्थिरता; निश्चितपणा. १०५
धुंदुवातीं–सोसाटयानें, धूत्कारांनीं, फटकाऱ्यांनीं. २७३
धूणी–क्षालन, परिमार्जन. २४४
नव (अय)–नैव, नाहीं, न. ३
नव्हेल–न होईल. ३७
नश्वरतां–नश्वर देहाच्या साधनानें. ६०
नागर–नट. ११९
नाचणु–नर्तक. २०३
निगम–वेद. ३३
निजसोय–आत्म-गति, आत्म-लोक १८७
निडारला–टक लावलेला, तारवटलेला, अनिमेष. ४
निढळ–कपाळ. ३
निधान–गुप्त धन. ९७
निखरणें–सोंपविणें, पदरीं घालणें. २०५
निर्धार–निकाल, निवाडा, निश्चय, खातरी १
निंबलोण–कडू निंबाचीं पानें, मीठ, मोहरी, इत्यादि दृष्ट काढण्याची सामग्री ८१
निभ्रांत–सत्य, पक्कें. ४
निवांत–निश्चळ १३७
निर्वाण–महासंकट, अगतिक दशा. १
नेटेंपाटें–तत्परतेनें. १९५
नेदूं–न देऊं ८
पंचाक्षरी–मांत्रिक. २१३
पडिभर–बहुलता. १५०
पढियणें–आवडणें. २७१
परतें–वेगळें, श्रेष्ठतर. २३६
परीस–पेक्षां (अव्यय). २८०
पवन–प्राण. २९०
पवाडे–प्रताप, पराक्रम. २८१
पाइक–चाकर, दास, सेवक. १०
पांगिला–मिंधा, आश्रित. २३८
पांग–आकांक्षा, हौस, सोस. १२३
पाचारणें–हांक मारणें, बोलावणें. ११५
पायवणी–पादोदक, पाय धुतल्याचें पाणी. ८५
पालवणें–पदर वा हात हालवून खुणावून बोलावणें. २४८

पुडी–पुटक, द्रोण. २४
पुढतीं पुढतीं–वारंवार, जन्मोजन्मीं. २२५
पुढारीं–पुढें कालांतरानें, लवकर. २१
पेणें–मुक्काम १००
पोसणें–पोष्य, आश्रित, भृत्य. ९
प्रौढी–ख्याति. १७६
वडिवार–गौरव, महत्त्व. २०१
बरवें–सुंदर. ११०
बांजट–कडाडणारें. ११५
बाहणें–हांक मारणें, बोलावणें. १८९
बाहे–बाहु, हात. १९३
ब्रीद–बाणा, भूषण, प्रतिज्ञा. १७८
बुंथ–घुंगट, ओढणी. ११४
बोभाय–बोलबोलणें. ११७
भव–संसार, प्रापंचिक गोष्ट. १५५
भाक–वचन ५१
भातें–खाद्य, अन्न. २७७
भातोडी–बाणांचा भाता. १४४
भिवरा–भीमरथी, भीमानदी ११३
भुकाळु–सदा क्षुधातुर. १८७
भोजें–भोजन. १०६
माजिवडें–केंद्रित. ३२
माव–माया, कपट. २१९
मुखवटी–मुख-प्रमाण, तोंडाचें माप. २५३
मूद–मुद्रिका. २३०
मोटा–मोठा. ६८
मांदुस–मंजुषा, पेटी. ४५
मोहरी–वेणुच्या तोंडावरील छेद. १४४
मौन्य–मौन, वाक्-स्तंभन १२०
म्हणियारा–हुकमाचा बंदा हुजऱ्या, दास. ४
येर–इतर, अवांतर. ६०
रंक–गरीब. १९७
रंग–(१) सत्त्व, पाणी (२) नटशाळा, सभागृह. २३०
रंगमाळा–रांगोळी. ७३
रंगण–फेर, मंडल, वर्तुळ. ११७
रंगशिळा–शिरगोळा, रांगोळीचे गोटे. २५७
रीघ–प्रवेश. २३७
लवलाहीं–तत्काळ. १८१
लटका–भासिक, मिथ्या, दिखाऊ, खोटा ६
लाघवी–मायावी, फसवा. ३०
लेखणें–गणणें, मोजणें. १९२
लोभापर–ममताळु, मायाळु. १२१
लोलिंगत–लंपट, लोलुप ३१
वचणें–जाणें. १५५
वर्म-बीज–रहस्य, गौप्य. ५४
वरपडा–झोंबता, सेविता. २४
वरो–पीक, लयलूट. ७२
वल्लभ–कान्त, पति. १८६
वाकळ–गोधडी. २०९
वांकी–एक पाद-भूषण. १७२
वाड–पुष्कळ, भरपूर, मोठें. ४१

वायांविण–अगदीं फुकट. ५
वालभा–कांत, स्वामी; पति. २८०
वास–प्रतीक्षा, वाट. ८५
वाहणें–धारण करणें. ११५
विखार–विषारी. १९
विझणें–पंखा. २९०
विटंबना–सोंग. १०
विसंबणें–अंतर देणें, सोडणें, विसरणें. १३१
वेडिव–वेडपण, अज्ञानता. ६९
वैराकार–उभा दावा. २२१
वोसरणें–पान्हावणें. ६९
वोवरी–खोली, पडवी. १४७
वोसंडणें–भरून वाहणें. २७९
वोळगणा–आश्रित. ८०
वोळगणें–उपासिणें, भजणें, सेवा करणें. ८२
व्यक्ति–प्रकटीभवन. २८९
शेजार–परिसर. २७२
सवंगें–स्वस्तांत. १२३
संभ्रम–धांदल, लगबग. १८१
सत्ता करणें–अधिकारानें मागणें. १७१
सरता–मान्य. १९
साचार–सत्य, खरेंखुरें १३६
साजणी–प्रेमिका, सखी. २२८
साबडें–भोळें, अकृत्रिम, अनलंकृत १७५
सांगडें–बंधन २३१
सांगडी–दोनचार भोंपळ्यांची मोट. १४४
सांठीं–राशी. २५३
सांडी–त्याग. १९८
सांडोवा–कुरवंडी, निर्माल्य, उतारा. ९२
सायासणें–झटणें, श्रमणें. १३३
साक्षिणें–पडताळणें, साक्ष घेणें ८२
साक्षेपें–कटाक्षानें, मुद्दाम. २५२
सुइणी–साविका, बाळतपणांत मदत करणारी सेविका २८७
सुतणें–निजणें, पहुडणें. २९०
सुभट–खंबीर, वीर ९९
सूति–जन्म. २७०
सोकणें–शुष्क होणें, कोरडणें, तहानणें. १९०
सोय–मार्ग. १०३
सोर–आकान्त (शोर हिंदी शब्द) १८५
सौरस–आवड, अनुराग. ११६
हडसणें–बजावणें. २३५
हंस–आत्महंस, आत्मा. ३
हांकार–आवाहन. २३०
हिंपुटी–कष्टी, हताश. २८
हेतु–अभिलाष. २६५
हेवा–लोभ, इच्छा, हव्यास. १९५
क्षेत्रवासी–तीर्थक्षेत्र-निवासी.

REFBK-0013504
REFBK-0013504